रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक २७१
www.ramprahar.com

# राम प्रहर

शनिवार, १९ एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

आरटीई प्रवेशासाठी वास्तव्याचे बोगस पुरावे; प्रवेश रद्द/२

कुडे लेणी, तळगड पाहण्यासाठी वर्दळ/५

रोशन खाडे कर्जत-खालापूर श्री किताबाचा मानकरी/८

## भगवद्गीतेचा ‘मेमरी ऑफ वर्ल्ड रजिस्टर’मध्ये समावेश

**नवी दिल्ली :** भारतासह जगभरात वास्तव्य करणाऱ्या तमाम भारतीयांसाठी अभिमानास्पद ठरावी अशी




बातमी समोर आली आहे. युनेस्को अर्थात जगभरातील हेरिटेज साईट्सचे जतन व संवर्धन करण्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या जागतिक संस्थेने भगवद्गीता व नाट्यशास्त्र या दोन भारतीय ग्रंथांचा आपल्या ‘मेमरी ऑफ वर्ल्ड रजिस्टर’मध्ये समावेश केला आहे. या समावेशानंतर या रजिस्टरमधील समाविष्ट भारतीय लिखितांची एकूण संख्या १४वर पोहोचली आहे. केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटनमंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी या संदर्भातील माहिती सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून दिली. या घोषणेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रत्येक भारतीयासाठी हा अभिमानास्पद क्षण आहे, अशी प्रतिक्रिया दिली आहे, तर भारताच शाश्वत ज्ञान आणि कलात्मक नैपुण्य यांचा हा सन्मान आहे, असे ना. शेखावत यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

### अपघातग्रस्तांसाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय

# एक लाखांपर्यंतचे उपचार होणार कॅशलेस

**मुंबई : प्रतिनिधी**

रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी रुग्णालये, सोसायटीचे अधिकारी व अंमलबजावणी संस्थांना कठोर दक्षता बाळगावी. यात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल तसेच अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार अंगीकृत व अन्य तातडीच्या रुग्णालयांमधून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी शुक्रवारी (दि. १८) दिले.

राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी (मुंबई) येथील मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या कामकाजाचा आढावा मंत्री आबिटकर यांनी घेतला.




या बैठकीस आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दयानंद जगताप, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहसचिव अशोक आत्राम, सहाय्यक संचालक डॉ. रवींद्र शेटे आदी उपस्थित होते.

जन आरोग्य योजनेतील प्रत्येक अंगीकृत रुग्णालयाने दर महिन्याला एक आरोग्य शिबिर आयोजित करून किमान पाच रुग्णांवर कॅशलेस उपचार करावेत. अशा शिबिरात लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेऊन त्याची पूर्वप्रसिद्धी करावी, असे मंत्री आबिटकर यांनी सूचित केले.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समित्या स्थापन करून त्यांच्या बैठका त्वरित आयोजित करण्यात याव्यात तसेच आयुष्मान कार्ड वाटप मोहिमेस गती देण्यासाठी आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, रेशन दुकानदार आणि नागरी सेवा केंद्रांच्या माध्यमातून वाटप करण्याची योजना आखण्यात आली आहे. या कार्यासाठी त्यांना मिळणाऱ्या मानधनात वाढ करण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले.

### जन आरोग्य योजनेसाठी स्वतंत्र मोबाईल ॲप

बैठकीदरम्यान मंत्री आबिटकर यांनी जन आरोग्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. यामध्ये योजनेतील अंगीकृत रुग्णालयांची संख्या १७९२वरून ४१८०पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय या योजनेतील उपचार संख्येत वाढ, दरामध्ये सुधारणा, अवयव प्रत्यारोपणासारखे महागडे उपचार समाविष्ट करणे तसेच प्राथमिक आरोग्यसेवाही योजनेत समाविष्ट करण्यासाठी अभ्यास समिती गठित करण्यात आली असून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश ना. आबिटकर यांनी दिले. जनतेसाठी योजनेतील रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला.



## भाजप कोकण विभागीय कोअर कमिटीच्या बैठका

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र प्रदेश भाजपच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या संघटन पर्व अभियानांतर्गत मंडल अध्यक्ष निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने कोकण विभागातील जिल्हा कोअर समिती सदस्यांच्या स्वतंत्र बैठका शुक्रवारी (दि. १८) राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह आणि प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात झाल्या.




यामध्ये रायगड दक्षिण, रायगड उत्तर, रत्नागिरी उत्तर, रत्नागिरी दक्षिण, सिंधुदुर्ग, भिवंडी, ठाणे शहर, उल्हासनगर या विभागांचा समावेश होता. या बैठकांच्या अनुषंगाने आगामी दोन दिवसांत भाजप मंडल अध्यक्ष निवड जाहीर करण्यात येणार आहे.

विविध बैठकांदरम्यान मंत्री नितेश राणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार निरंजन डावखरे, आमदार सुलभा गायकवाड, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार विनय नातू, प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, कार्यकारिणी सदस्य मनोहर केमचंदानी, महामंत्री माधवी नाईक, राजेश पांडे, मुख्यालय प्रभारी रवी अनासपुरे, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, श्रीनंद पटवर्धन, सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष केदार साठे, दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष राजेश सावंत, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, उल्हासनगर जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी आदी उपस्थित होते.

## खारघरमध्ये रंगणार भाजप सांस्कृतिक महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून भाजप सांस्कृतिक महोत्सव १ ते ४ मेदरम्यान खारघर सेक्टर १२ येथील गावदेवी मैदानावर रंगणार आहे. या महोत्सवात मनोरंजन, इतिहास, कला तसेच महाराष्ट्राच्या विविध भागातील मिसळ महोत्सवाचा संगम पहायला मिळणार आहे.




खारघर भाजप आयोजित या महोत्सवात १ मे रोजी सायंकाळी ६ वाजता ९० कलाकारांच्या संचासह महाराष्ट्राची महासंस्कृती कार्यक्रम होईल. यात आपल्या राज्याच्या विविध सांस्कृतिक परंपरा आणि शिवराज्याभिषेक सोहळ्याचे भव्य सादरीकरण होणार आहे. २ मे रोजी सायंकाळी ६ वाजता खारघर आणि पनवेल परिसरातील विविध संस्थांचा सांस्कृतिक कलाविष्कार, ३ मे सायंकाळी ६ वाजता सुप्रसिद्ध गायिका मुग्धा वैशंपायन आणि गायक प्रथमेश लघाटे यांच्या सुमधुर गाण्यांची मैफल होईल. या वेळी निवेदक म्हणून विघ्नेश जोशी उपस्थित असतील.

महोत्सवात चारही दिवस सायंकाळी ५ ते रात्री १० वाजेपर्यंत महाराष्ट्राच्या विविध भागांतील चविष्ट मिसळचे स्टॉल्स असणारा मिसळ महोत्सव तसेच ऐतिहासिक शस्त्रांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात येणार आहे.

## म्हसळा भूमी अभिलेख सर्वेअर लाच घेताना जेरबंद



**म्हसळा : प्रतिनिधी**

जमीन मोजण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना म्हसळा येथील भूमी अभिलेख कार्यालयातील सर्वेअर विशाल भिमा रसाळ (वय २९) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगडच्या पथकाने माणगाव एसटी स्टँड येथे रंगेहात पकडले.

तक्रारदार यांना अखत्यारपत्र दिलेल्या व्यक्तीच्या वरवठणे (ता. म्हसळा) येथे असलेल्या सर्वे क्रमांक ५२/१ब या जमिनीची मोजणी आकारफोड व क प्रत देण्याकरिता सर्वेअर विशाल रसाळ याने ५० हजारांची लाच मागितली होती. याबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगड यांच्याकडे तक्रार दिली. त्या अनुषंगाने गुरुवारी (दि. १७) माणगाव एसटी स्टँड येथे सापळा लावून रसाळला लाच घेताना पकडण्यात आले.

## निवडक

### जगन मोहन रेड्डींचे २७.५ कोटींचे शेअर्स ईडीकडून जप्त

**हैदराबाद :** आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांच्यावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई केली आहे. ईडीच्या हैदराबाद युनिटने जगन मोहन रेड्डी यांचे २७.५ कोटी रुपयांचे शेअर्स तात्पुरते जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. १४ वर्षांपूर्वीच्या जुन्या मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीने ही कारवाई केली आहे. हे संपूर्ण प्रकरण ‘क्विड प्रो क्वो’ गुंतवणुकीच्या संदर्भातील असल्याची माहिती सांगण्यात येत आहे.



### पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि एलॉन मस्क यांच्यात चर्चा

**नवी दिल्ली :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि टेस्ला कंपनीचे संस्थापक एलॉन मस्क यांच्यात तंत्रज्ञान तसेच नवोपक्रमाच्या क्षेत्रातील कामाबाबत फोनवरून चर्चा झाली. याआधी या दोघांची अमेरिकेत भेट झाली होती. लवकरच भारतात मस्क यांचा नवा उपक्रम सुरू होणार असल्याची किंवा टेस्लाची भारतातील एन्ट्री पक्की झाल्याचे सांगण्यात येत आहे.

## १५९ क्रीडावीरांचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने गौरव

### ऑलिम्पिकसाठी खेळाडूंनी सज्ज व्हावे –राज्यपाल

**पुणे : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे २०३६ची ऑलिम्पिक स्पर्धा भारतात व्हावी यासाठी प्रयत्न करीत असून महाराष्ट्रातील आपल्या खेळाडूंना ऑलिम्पिकसाठी सज्ज व्हावे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी शुक्रवारी (दि. १८) शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराच्या समारंभात केले.

महाराष्ट्र शासनाचा शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आयोजित शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते देण्यात आले. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, पणनमंत्री जयकुमार रावल, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, क्रीडा आयुक्त हिरालाल सोनवणे, राज्याचे क्रीडा सहसंचालक सुधीर मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.



पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात २०२२-२३ व २०२३-२४ असे दोन वर्षांचे शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात आले. ज्येष्ठ आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू प्रदीप गंधे आणि माजी राष्ट्रीय कबड्डीपटू, संघटक शकुंतला खटावकर यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पॅरा ऑलिम्पिक पदक विजेता सचिन खिलारी, जागितिक विजेते आर्चर आदिती स्वामी, ओजस देवतळे यांच्यासह राज्यातील १५९ जणांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने गौरविण्यात आले.


शिवछत्रपती पुरस्कार म्हणजे खेळाडूंच्या मेहनतीला राजमान्यता असे सांगून आपल्या मनोगतात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शिवछत्रपतींच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार सर्वच पुरस्कार्थींचा अभिमान वाढवणारा आहे. पदकांची भरारी आपण सुरू केली आहे. राष्ट्रीय खेळाडूंची आंतरराष्ट्रीय पातळीवरील कामगिरी उंचवावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. चांगल्या खेळाडूंना प्रशिक्षणासाठी आपण परदेशी पाठवतो. पण आता त्यांच्यासोबत त्यांचे प्रशिक्षक, फिजिओ यांनाही परदेशी जाता येणार आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धा करण्यासाठी हे गरजेचे आहे. खेळाडूंच्या सन्मानासाठी पारितोषिक रक्कम वाढवणे व थेट नियुक्ती आपण देत आहोत. खेळासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. तालुक्यापर्यंत चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करत आहोत. महाराष्ट्राच्या खेळाडूंची सर्वोत्तम कामगिरी होत आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, दरवर्षीचा पुरस्कार सोहळा त्याच वर्षी झाला पाहिजे, अशी माझी क्रीडामंत्री, अधिकाऱ्यांना विनंती आहे. आगामी पुरवणी मागण्यांमध्ये क्रीडा विभागाला वाढीव रक्कम मंजूर करून त्यांची मागणी पूर्ण केली जाईल. सर्व पुरस्कारार्थींचे मनापासून अभिनंदन करतो. तुम्ही खेळाडू घडवण्याचे काम करा आम्ही तुमच्या पाठीशी उभे राहू.

राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचे कौतुक करून नवोदित खेळाडूंना प्रेरणा देणे हा या क्रीडा पुरस्कार सोहळ्याचा मुख्य उद्देश, असे सांगून राज्याचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, पुरस्कारार्थींच्या नावापुढे छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव जोडले जाणार आहे. त्यामुळे सर्व पुरस्कारार्थींना आयुष्यभर त्याचा अभिमान वाटेल. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर भरीव कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना चांगली पारितोषिक रक्कम आणि थेट नियुक्ती देत क्रीडा क्षेत्रासाठी पोषक वातावरण तयार करण्याचा प्रयत्न आहे.

कार्यक्रमाचे प्रास्तविक क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी मानले.

## सलग सुट्ट्यांमुळे बोरघाटात वाहतूक मंदावली



**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

सलग सुट्ट्यांमुळे शुक्रवारी (दि. १८) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची संख्या वाढल्याने वाहतूक अत्यंत संथ गतीने सुरू होती. या वेळी पुणे दिशेने जाणाऱ्या राज्यपाल महोदयांचा ताफा जुन्या महामार्गावर वळविण्यात आला.

गुड फ्रायडेच्या सार्वजनिक सुट्टीसह जोडून आलेल्या वीकेण्डमुळे मोठ्या प्रमाणात मुंबईकर खंडाळा, लोणावळा व पुणे दिशेकडे निघाले. अधिक प्रमाणात वाहने आल्याने मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर खंडाळा घाटात सकाळी ७ वाजल्यापासून वाहतूक कोंडीचा सामना वाहनचालकांना करावा लागला. या वेळी वाहतूक पोलिसांनी मध्ये मध्ये मुंबई लेनवर ब्लॉक घेऊन त्या ठिकाणी पुणे दिशेकडील वाहतूक वळविली. त्यामुळे नेहमी होणारी चक्काजाम वाहतूक या वेळी दिसून आली नाही, मात्र पुणे दिशेकडे वाहतूक मंद गतीने होती.

दरम्यान, एक्स्प्रेस वेच्या वाहतूक कोंडीचा फटका राज्यपालांनाही बसला. मुंबईकडून पुणे दिशेला जाणारे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचा ताफा मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून पुण्याकडे वळविण्यात आला.

## डीपीएस फ्लेमिंगो तलाव संवर्धन राखीव क्षेत्र घोषित

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाने नवी मुंबईतील नेरूळ येथील ३० एकरच्या डीपीएस फ्लेमिंगो तलावाला संवर्धन राखीव म्हणून घोषित करण्याच्या अधिकृत शिफारसीला मान्यता दिली. या निर्णयाने पर्यावरणप्रेमींनी आनंद व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वनविभागाचा आढावा घेतला. या वेळी वनमंत्री गणेश नाईक यांनी डीपीएस तलावाचे व फ्लेमिंगो संवर्धनाचे महत्त्व मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर मांडले. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी हा तलाव संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून घोषित केले.

ठाणे ग्रीक फ्लेमिंगो अभयारण्याच्या उपग्रह पाणथळ परिसंस्थेचा भाग असलेला हा पहिला पाणथळ प्रदेश आहे, जो संवर्धन मालमत्ता म्हणून संरक्षित केला गेला आहे. वनमंत्री नाईक यांनी सांगितले की, हा तलाव फ्लेमिंगोंसाठी एक महत्त्वाचे स्थान म्हणून ओळखले जाते. शहराच्या जैवविविधतेच्या हितासाठी त्याचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे.

## जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये उन्हाळी शिबिरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान कौशल्य विकसित करण्यासाठी राज्यात निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत कृती कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्ययन स्तरावर आणण्यासाठी शाळा पातळीवर उन्हाळी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी संबंधित अधिकारी आणि शिक्षकांना या शिबिरांचे आयोजन करण्याचे आदेश दिले आहेत.

उन्हाळी शिबिरांमुळे विद्यार्थ्यांची पायाभूत शैक्षणिक कौशल्ये अधिक सक्षम होऊन पुढील शैक्षणिक वर्षासाठी आवश्यक तयारी होऊ शकेल हा उद्देश आहे. १ मे ते १५ जून या दरम्यान एकूण सहा आठवडे इतक्या कालावधीचे उन्हाळी शिबिर शाळा पातळीवर आयोजित करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या शिबिराच्या आयोजनामध्ये स्थानिक युवक-युवती, माता गटाच्या लीडरमाता, सदस्य माता, विविध सेवाभावी संघटना, प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचे सदस्य तसेच अंगणवाडी सेविका इत्यादींचा स्वयंसेवक म्हणून सहभाग असणार आहे.

उन्हाळी शिबिर स्वयंसेवकांच्या सक्रिय सहभागाद्वारे राबविण्यात येणार असून स्वयंसेवकांकडे भाषा व गणित या विषयांवर आवश्यक किमान ज्ञान, कौशल्य व आवड असणे अपेक्षित आहे. या उपक्रमांतर्गत इयत्ता नववी ते बारावीमधील इच्छुक विद्यार्थीही लीडर म्हणून सहभागी होऊ शकतात. प्रत्येक गावातून किमान १० ते १५ विद्यार्थ्यांमागे एक असे किमान दोन ते तीन स्वयंसेवक निवडून त्याना प्रथम संस्थेच्या वतीने आवश्यक प्रशिक्षण, साहित्य व सातत्यपूर्ण मार्गदर्शन प्रदान करण्यात येईल.

### स्वयंसेवकांची नोंदणी

*मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेकरिता निवडलेल्या स्वयंसेवकांची माहिती केंद्रप्रमुखांना द्यावी. स्वयंसेवकांच्या नोंदणीकरिता राज्यस्तरावरून लिंक देण्यात येईल. त्या लिंकमध्ये स्वयंसेवकांची नोंदणी करावी. स्वयंसेवकांना आवश्यक प्रशिक्षण साहित्य प्रथम संस्थेद्वारे दिले जाईल. सातत्यपूर्ण मार्गदर्शन करण्यात येईल. स्वयंसेवक व निवडक मातांचे शिबिराच्या अनुषंगाने ऑनलाईन व प्रत्यक्ष स्वरूपात उद्बोधन करणे आणि अंमलबजावणीसाठी प्रथम संस्थेच्या प्रतिनिधींचे सहकार्य घ्यावे. स्वयंसेवकांना कोणत्याही प्रकारचे मानधन दिले जाणार नाही, मात्र स्वयंसेवकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.*

# सरकारी योजनांच्या सहकार्याने औषधी वनस्पतींची लागवड वाढवा

## केंद्रीय आरोग्यमंत्री प्रतापराव जाधव यांची सूचना

**माणगाव : बातमीदार**

आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून राष्ट्रीय औषध नियंत्रण बोर्ड औषधी वनस्पतींची लागवड, संरक्षणाकरीता काम करीत आहे. केंद्र शासन औषधी वनस्पतींच्या संवर्धन, संरक्षणासह मोठ्या प्रमाणावर लागवडीसाठी सहकार्य करण्यास तयार आहे. केंद्र आपल्या विविध योजना आणि उपक्रमांच्या माध्यमातून औषधी वनस्पतींची प्रमाणीत कच्च्या मालाच्या स्वरूपात उपलब्ध होण्यासाठी काम करीत आहे, केंद्र शासनाच्या उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर राज्यात औषधी वनस्पतींची लागवड करावी, अशा सूचना केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री तथा आयुष (स्वतंत्र प्रभार) मंत्री प्रतापराव जाधव यांनी शुक्रवारी दिल्या.



सह्याद्री अतिथीगृह येथे याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव, अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले, आपल्या पारंपारिक उपचार पद्धतीमध्ये आयुर्वेद, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी यांचा समावेश आहे. आजार कमी करण्यासाठी सध्याही औषधी वनस्पती गुणकारी आहे. अशा औषधी वनस्पतींचे संरक्षण, लागवड होणे काळाची गरज असून त्यांना वनांमधून प्राप्त करता येत आहे. केंद्र शासनाकडून औषधी वनस्पतींच्या प्रक्रिया उद्योगासाठी आर्थिक मदत देण्यात येते.

औषधी वनस्पतींच्या संवर्धनासाठी उत्तम साठवणूक व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे. केंद्र शासन महाराष्ट्र शासनासोबत या क्षेत्राच्या विकासासाठी काम करेल. शेतकऱ्यांसाठी औषधी वनस्पतींच्या लागवडीतून रोजगार उपलब्ध होणार आहे. या योजनेवर गांभीर्याने काम करून शेतकऱ्यांना नवीन रोजगाराचे दालन उपलब्ध करून द्यावे, अशा सूचनाही दिल्या.

# आरटीई प्रवेशासाठी वास्तव्याचे बोगस पुरावे; विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील खारघर येथे शिक्षणाचा अधिकार (आरटीई ) प्रवेशासाठी काही पालकांकडून वास्तव्याचे बोगस पुरावे जोडल्याचे उघड झाले आहे. पडताळणी समितीकडून या सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांचे आरटीई अंतर्गत प्रवेश रद्द करून प्रतिक्षा यादीवरील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची विनंती पनवेलचे गट शिक्षण अधिकारी सिताराम मोहिते यांनी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात केली आहे.




आरटीई कायद्याचा गैरवापर करून नामांकीत शाळांमध्ये प्रवेशासाठी प्रयत्न केले जात असल्याची बाब रायगड जिल्ह्यात समोर आली आहे. खारघर येथील विश्वज्योत हायस्कूल मध्ये आरटीई अंतर्गत १३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता. या प्रवेशासाठी पालकांनी वास्तव्याचा जो पुरावा दिला होता. त्या ठिकाणी विद्यार्थी आणि त्यांचे पालक वास्तव्य करत नसल्याची बाब पडताळणीत समोर आली आहे.

शाळा व्यवस्थापानाने या विद्यार्थ्यांच्या पालकांना याबाबतची कल्पना दिली. विद्यार्थ्यांच्या पालकांना शाळेत बोलावून त्यांचे वास्तव्य संबधित ठिकाणीच असल्याचे सिध्द करण्यास सांगीतले. त्यासाठी पुरेसा वाव देण्यात आला. मात्र तरीही त्यांना आरटीई प्रवेशासाठी दिलेल्या पत्त्यावर राहत असल्याचे पालकांना सिध्द करता आलेले नाही. त्यामुळे चुकीचा पत्ता देऊन या पालकांनी आपल्या पाल्यांसाठी आरटीई अंतर्गत प्रवेश मिळवल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे पडताळणी समितीकडून या सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे या सर्व विद्यार्थ्यांचे आरटीई अंतर्गत प्रवेश रद्द करून प्रतिक्षा यादीवरील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची विनंती पनवेलच्या गट शिक्षण अधिकारी सिताराम मोहिते यांनी प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी रायगड जिल्हा परिषद यांच्याकडे लेखी स्वरुपात केली आहे.

आरटीई कायद्यातील तरतुदींचा गैरवापर करून अनेक पालक आपल्या पाल्यांना चांगल्या शाळांमध्ये प्रवेश मिळावा यासाठी प्रयत्न करत असल्याचे यावरून पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. काही दिवसांपूर्वी अलिबाग येथील चिंतामणराव केळकर विद्यालयाचे अध्यक्ष अमर वार्डे यांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडे आरटीई अंतर्गत प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी रद्द करण्याची मागणी केली होती.

शालेय शिक्षण मंत्र्यांना या संदर्भात पत्र लिहून वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली होती. मात्र त्यावर शिक्षण विभागाने फारशी कारवाई केली नव्हती. आता पनवेल मध्येही आरटीई प्रवेशासाठी गैरप्रकार होत असल्याचे सिध्द झाले आहे.

# मुरूडच्या स्थानिकांना पार्किंगची समस्या! रहदारीला अडथळा



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरात पार्किंग नसल्याने वाहन चालक कुठे ही गाडी रस्तावर पार्किंग करत असल्याने रहदारीला सामोरे जावे लागत आहे.यामुळे पायी चालणाऱ्या नागरिक अक्षरक्ष हैराण झाले आहेत.दिवसादिवस शहरांतील वाहने पार्किंगची समस्या मोठी डोकेदुखी ठरत आहे. वाहनांची संख्या वेगाने वाढली आहेत वाढत आहेत भविष्यात सर्वच ठिकाणी पार्किंग व्यवस्था ही काळाची गरज असणार आहे.

मुरुड पर्यटन क्षेत्र आहे शेकडो पर्यटक आपली वाहने घेऊन वेगवेगळ्या पर्यटन स्थळी आनंद घेण्यासाठी येत असतात. शहरात ही येत असल्याने पार्किंगच्या समस्यांनी त्रस्त होतात. आजुनही शासनाकडून कोणतीच उपाय योजना नसल्याने रोजच्या रोज पार्किंगची समस्या शहरात जाणवत आहे. तरी बाजारपेठेत एकदिक्षा मार्ग पार्किंगचा अवलंबला केला तर काहीतरी रहदारीची समस्या निघेल व नागरिकांना दिलासा मिळणार आहे.मुरुड पोलिस यांनी या बाबी कडे गांभीर्यपूर्वक पहावे अशी मागणी जनतेमधून होत आहे.

# मारहाण करून इसमास लुटले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरात एका इसमास मारहाण करून त्याच्याकडील रोख रक्कम लुटल्याची घटना घडली आहे. तसौर अन्सारी याच्या खिशातून १२०० रुपये काढून अनोखी व्यक्तींनी दगडाने त्याला मारहाण केली. या प्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# लाखो रुपयांचा अपहार; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

आयफोनची विक्री, बनावट बिले, ग्राहकाकडून स्वीकारलेल्या रोख रकमेचा अपहार केल्याप्रकरणी अशोक घराई याच्याविरोधात पनवेल शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मयूर गावडे हा स्टोअर मॅनेजर म्हणून काम करतो. त्यांच्याकडे घराई हा कॅश हाताळण्यासाठी आला होता. दुकानांमधून नऊ आयफोनची किंमत बारा लाख ३७ हजार ७४० रुपये कंपनीच्या बँक खात्यात जमा झाले नसल्याचे निदर्शनास आले. कॅशियरचे कोड पडताळणी केले असता अशोक घराई याने दुकानांमध्ये असलेल्या क्रेडिट कार्ड मशीनमध्ये बनावट लिंक बनवून त्यामार्फत बिलिंग सॉफ्टवेअरमध्ये बनावट कोड तयार केला आणि नऊ फोन स्टोअरमधून विकले. या आयफोनची विक्री करून त्याने ग्राहकाकडून स्वीकारलेली रोख रक्कम दुकानांमध्ये जमा केली नाही.

# शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या ऋषिकेश मालोरेची माणगावात मिरवणूक

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (सन २०२३ – २४) ने माणगाव तालुक्यातील न्हावे गावचे सुपुत्र ऋषिकेश मालोरे यांना पुण्यात शुक्रवार दि.१८ एप्रिल रोजी सकाळी ११ वा.बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात झालेल्या भव्यदिव्य कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व राज्यपाल सीपी राधाकृष्ण, अजित पवार आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. ऋषिकेश पुंडलिक मालोरे याने वुशू खेळात विशेष अशी चमक तालुका,जिल्हा,राज्य व राष्ट्रीय पातळीवरदाखविल्याने या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली. ऋषिकेश मालोरेला प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त झाल्याने माणगावात शुक्रवारी सायंकाळी त्यांची मिरवणूक काढून स्वागत केले




# खारघर शिवसेना उपशहरप्रमुखपदी हेमंत ब्रिजेश सिंह यांची नियुक्ती



**पनवेल : वार्ताहर**

हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी खारघर उपशहरप्रमुखपदी हेमंत ब्रिजेश सिंह यांची नियुक्ती करून त्यांना नियुक्तीपत्र खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते देण्यात आले आहे.

हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण यांचा सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार कराल, तसेच शिवसेना पक्षवाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेवून कार्य कराल असा विश्वास यावेळी खा.श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला आहे. या नियुक्तीवेळी जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे व खारघर शहरप्रमुख प्रसाद सावंत आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# अखिल भारतीय विद्युत मंडळाच्या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या ४६व्या क्रीडा स्पर्धेचे उदघाटन महापारेषणच्या कराड परिमंडलाच्या मुख्य अभियंता तथा क्रीडा स्पर्धा आयोजन समितीच्या अध्यक्षा श्रीमती शिल्पा कुंभार यांच्या हस्ते रोप जलार्पण करून थाटात करण्यात आले.

याप्रसंगी महावितरणचे प्रादेशिक संचालक तथा कार्यकारी संचालक (नियोजन) भुजंग खंदारे, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) डॉ. नितीन वाघ, महावितरणचे प्रादेशिक संचालक परेश भागवत, महावितरणचे मुख्य अभियंता स्वप्नील काटकर, महानिर्मितीचे मुख्य अभियंता संजय चोपडे, महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी तथा उपाध्यक्ष भरत पाटील, महावितरणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी. संजय ढोके, महानिर्मितीचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजूरकर, महानिर्मितीचे सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी ललित गायकवाड, अधीक्षक अभियंता तथा सचिव प्रांजल कांबळे, महानिर्मितीचे महाव्यवस्थापक (मानव संसाधन) आनंद कोंत, क्रीडा स्पर्धेचे निरीक्षक सुरेंदर शेवकंद, महावितरणचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी शिरीष काटकर, महानिर्मितीचे कल्याण अधिकारी प्रसाद निकम उपस्थित होते.


येथील शिवाजी विद्यापीठात दि. १७ ते १९ एप्रिल या कालावधीत या स्पर्धा होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने ॲथलेटिक्स, कॅरम व व्हॉलीबॉल स्पर्धेचा समावेश आहे. या स्पर्धा महापारेषण, महानिर्मिती, महावितरण कंपनीच्या संयुक्त विद्यमाने होत आहेत. देशभरातून सुमारे एक हजार महिला व पुरुष खेळाडू यामध्ये सहभागी झाले आहेत.

क्रीडा संकुलात सकाळी दहा वाजता सर्व खेळाडूंनी संचलन करीत पाहुण्यांना मानवंदना दिली. तदनंतर क्रीडा ज्योतीचे आगमन व प्रज्वलन झाले. तसेच क्रीडा ध्वजारोहणानंतर महाराष्ट्र गीत सादर करण्यात आले. या वेळी शिवकालीन मर्दानी खेळाचे सादरीकरण व मल्लखांब प्रात्यक्षिक करण्यात आले. चषकाचे अनावरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापारेषणच्या कराड परिमंडलाच्या मुख्य अभियंता तथा क्रीडा स्पर्धा आयोजन समितीच्या अध्यक्षा श्रीमती शिल्पा कुंभार होत्या. या वेळी परेश भागवत, डॉ. नितीन वाघ,. भुजंग खंदारे यांनी मार्गदर्शनपर भाषणे केली.

अध्यक्षीय भाषणात श्रीमती कुंभार म्हणाल्या, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्यातील स्पिरीट जागरूक ठेवण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले आहे. यामध्ये पुरूष व महिलांनी खिलाडूवृत्ती जपून चांगल्या खेळाचे प्रदर्शन करावे. या क्रीडा उत्सवात मन व शरीर सदृढ ठेवण्याकडे खेळाडूंनी लक्ष दिले पाहिजे.

# अज्ञात चोरट्यांनी केलेल्या चोरीमध्ये महागडा ऐवज लंपास

**पनवेल : वार्ताहर**





तळोजा फेज १ येथे अज्ञात चोरट्याने केलेल्या चोरीमध्ये सोन्याच्या दागिन्यांसह मोबाईल फोन चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

नेहा गुप्ता या तळोजा फेज वन येथे राहत असून, त्या रूमची गॅलरी ओपन करून झोपल्या होत्या. चोराने उघड्या गॅलरीतून आत प्रवेश करून घरातील सोन्याचे दागिने आणि ३ मोबाइल चोरून नेले. या प्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# तरुण बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**



सकाळी कामाला जातो असे सांगून घराबाहेर पडलेला एक तरुण अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

महेश प्रेम चव्हाण (२२ रा.एन.के.गार्डन वावंजे) असे या तरुणाचे नाव असून बांधा मध्यम, उंची ५ फुट ५ इंच, केस काळे वाढलेले, डोळे काळे, रंगाने गोरा, नाक सरळ, डाव्या हातावर इंग्रजीत मॉम-डॅड असे गोंदलेले असून अंगात मरुन रंगाचा फुल शर्ट व काळ्या रंगाची जिन्स पॅन्ट सोबत मोबाईल फोन आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो.ना.सुशिल सरगर मो. नं.८३६९४८४२१२ संपर्क करा

# सेल बेस थेरेपीने १५ वर्षीय केनियाच्या रुग्णावर यशस्वी उपचार

**नवी मुंबई : बातमीदार**

पॉलीमायोसिटिसचे निदान झालेल्या केनीयातील १५ वर्षीय शॅननवर मुंबईत यशस्वी उपचार करण्यात आले. स्टेमआरएक्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे संस्थापक डॉ. प्रदीप महाजन यांच्या नेतृत्वाखाली सेल बेस थेरेपीचा वापर करुन या रुग्णाला आजारातून मुक्त करण्यात डॉक्टरांना यश आले.



पॉलीमायोसिटिस या आजारामध्ये सुरुवातीला कमरेच्या वरचे स्नायू कमकुवत होतात. यानंतर ते हळूहळू संपूर्ण शरीरात पसरते. यामुळे रुग्णाला अशक्तपणासारखी समस्या सतावू लागली. तिला चालणे, बोलणे तसेच दैनंदिन कामं करणे देखील अशक्य होऊ लागले होते.

एके काळी शाळा आणि रोजच्या दिनक्रमाचा मनसोक्त आनंद घेणाऱ्या १५ वर्षीय शॅननला अचानक सर्दीसारखी ऍलर्जी झाली आणि लवकर त्याचे रुपांतर एका गंभीर आजारात झाले ज्यामुळे ती अंथरुणाला खिळली. तिच्या पायांमधील संवेदनशीलता कमी होऊ लागली, तिला तीव्र वेदना होत होत्या, हालचाल करण्यात अडचण येत होती आणि खाण्यापिण्यासारख्या मूलभूत कामांमध्येही तिला आधाराची गरज भासत होती. केनियातील डॉक्टरांनी अनेक चाचण्या करूनही तिच्या आजाराचे मुळ कारण ओळखू शकले नाहीत.

शॅननची आई आपल्या मुलीची ही अवस्था पाहून अतिशय चिंताग्रस्त झाली होती.मार्चच्या सुरुवातीला भारतातील डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर, शॅनन आणि तिच्या आईने पुढील उपचारांसाठी भारतात येण्याचा निर्णय घेतला. स्टेमआरएक्स रुग्णालयात दाखल झाल्यानंतर डॉ. प्रदीप महाजन यांनी केलेल्या तपासणीत शॅननला पॉलीमायोसिटिस हा एक ऑटोइम्यून रोग( स्वयंप्रतिकार रोग)असल्याचे समजले, ज्यामुळे तिच्या स्नायुंना सूज आली होती.

स्टेमआरएक्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे संस्थापक आणि रिजनरेटिव्ह मेडिसिन संशोधक डॉ. प्रदीप महाजन म्हणाले, स्टेमआरएक्समध्ये, आमच्या स्टेम सेल थेरेपीद्वारे उपचार, टार्गेटेड फिजिओथेरपी आणि न्यूरो-रिहॅबिलिटेशनचा वापर करून खराब झालेले स्नायू, ऊतींची पुनर्निमिती करणे आणि मोटर स्कील्सला चालना देण्यात आली.

# प्लास्टिक बंदी अंतर्गत मनपाची कारवाई

## तीन हजार ५०० किलो प्लास्टिक जप्त, २५ हजार दंड वसूल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्लास्टिक बंदी मोहिमेअंतर्गत पनवेल महानगरपालिकेने दिनांक १७एप्रिल रोजी धडाकेबाज कारवाई करत ३ हजार ५०० किलो प्लास्टिक पिशव्या जप्त केल्या असून २५ हजार रुपयांचा दंडही वसूल केला आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या नियंत्रणात पनवेलच्या सर्व विभागात ही मोहीम राबविली.



पनवेल महानगरपालिका हद्दीत चारही प्रभाग समिती निहाय प्लास्टिक बंदी कारवाई करण्यात आली यामध्ये कामोठे प्रभाग समितीमध्ये प्लास्टिक जप्ती कारवाईवेळी प्रभाग क कामोठेमध्ये सुमारे ३०० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यामध्ये प्लास्टिक चमचे, ग्लास, वाट्या, प्लेट यांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच यावेळी एकूण दहा हजार दंड जमा करण्यात आला.

नावडे उपविभाग-प्लास्टिक बंदी कारवाई दरम्यान नावडे उपविभागात प्लास्टिक साठा करणाऱ्या गोडाऊनवर कारवाई करून सुमारे १ हजार ८५० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

तसेच खारघर प्रभाग समिती अ मध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई दरम्यान प्लास्टिक २५० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी एकूण ५ हजार दंड वसूल करण्यात आला.

कळंबोली प्रभाग समिती ब मध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई दरम्यान४५० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी एकुण पाच हजार दंड जमा करण्यात आला.

पनवेल प्रभाग समिती ड मध्ये प्लास्टिक विरोधी कारवाई दरम्यान ६५० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले तसेच एकूण पाच हजार दंड जमा करण्यात आला.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करता कागदी अथवा कापडी पिशव्यांचा वापर करून पनवेल महानगरपालिका प्लास्टिक मुक्त करण्याच्या दृष्टीने महापालिकेस मदत करावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

### यावर बंदी...

* प्लास्टिकच्या कांड्यासह कानकोरणी, फुग्यांसाठी प्लॉस्टिकच्या कांड्या, प्लास्टिकचे झेंडे, कॅंडी, कांड्या, आईस्क्रीम कांड्या, सजावटीसाठी प्लास्टिक व पॉलिस्टीरीन (थर्माकोल) यावरती बंदी करण्यात आली आहे.
* दुकानदारांनी कंपोस्टेबल पदार्थापासून बनविण्यात आलेले एकल वापर वस्तु उदा. स्ट्रॉ, ताट, कप्स, प्लेटस, ग्लासेस, काटे, चमचे, भांडे, वाडगा, कन्टेनर इ. तथापि, कंपोस्टेबल पदार्थापासून प्लास्टीक पासून बनविलेल्या अशा वस्तू कंपोस्टेबल असल्याबाबत सेंट्रल इन्स्टीट्यूट ऑफ प्लास्टीक इंजिनिअरींग अँड टेक्नॉलॉजी (उखझएढ) व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्रमाणित करून घेणे बंधनकारक राहील.

# पनवेल महापालिका नावडे उपविभागात अतिक्रमण विभागाची जोरदार कारवाई



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनात व उप आयुक्त रविकिरण घोडके यांच्या नेतृत्वात अतिक्रमण विभागाने नावडे उपविभागात अतिक्रमण हटावची जोरदार मोहीम गेले दोन दिवस यशस्वीपणे राबवली.

अतिक्रमण विभागाने उपविभाग नावडे हद्दीतील नागझरी चाळ येथे वर्षारी फॅक्टरी, अनुप बापट, रोहित एंटरप्राझेस,एफ जी ग्लास, एफ जी ग्लास ,अशोक लैलेंड यांचे अनधिकृत उभारलेल्या गोडाऊनवर कारवाई करून तेथील अतिक्रमण हटवले आहे.

उपविभाग नावडे धरणा कॅम्प बाटली कंपाऊंडमध्ये तोडक कारवाई पनवेल महापालिका उपविभाग नावडे हद्दीतील धरणा कॅम्प बाटली कंपाउंड येथे १७ एप्रिल रोजी अनधिकृत गोडाऊनवर कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त रविकिरण घोडके तसेच प्रभाग अधिकारी अरविंद पाटील, अमर पाटील, नगररचना विभागातील नितीन हुद्दार, ड्राफ्टमॅन अभिजित घुटुकडे, पनवेल महानगरपालिकेचे कर्मचारी आणि एमएसएफचे जवान, पोलीस अधिकारी, कर्मचारी अतिक्रमण पथक आणि विद्युत पथक सदर कारवाईस उपस्थित होते.

**पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात नागरिकांनी बांधकाम करण्यापूर्वी महापालिकेची रितसर परवानगी घेणे गरजेचे आहे. परवानगी न घेता केलेले बांधकाम हे अनधिकृत आहे असे समजून त्यावर पालिकेच्या वतीने तोडक कारवाई करण्यात येईल. अनाधिकृत केलेल्या बांधकामाला कोणतेही संरक्षण दिले जाणार नाही. याची गांभीर आणि नोंद घेऊन महापालिकेत सहकार्य करावे.**

**-रविकिरण घोडके, उपायुक्त**
पनवेल महानगरपालिका



**उलवे, : उरण येथील कॉंग्रेसचे सरचिटणास मिलिंद पाडगावकर यांचे वडील दत्तात्रेय गोविंद पाडगावकर (माजी महसूल सहाय्यक आयुक्त) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. माजी खासदार रामशेठ ठाकूर आणि कामगार नेते, कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी मिलिंद पाडगावकर परिवाराचे घरी जाऊन सांत्वन केले.**

## चालकाचा दुर्दैवी मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

दोन ट्रकच्यामध्ये अडकल्याने हनुमंत बाबा राजगे (वय ४१) या ट्रकचालकाचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद कळंबोली पोलिस ठाण्यात करण्यात आली. ट्रकवरील चालक हनुमंत राजगे यांनी त्यांचा ट्रक दुरुस्तीसाठी गॅरेजवर नेला होता.ट्रकचे काम पूर्ण झाले होते. काम व्यवस्थित झाले आहे का, हे तपासण्यासाठी त्याने गाडीच्या खाली उभे राहून ट्रकची चावी फिरवली. ट्रक गिअरमध्ये असल्याने पुढे गेला आणि तो बाजूला उभा असलेला ट्रकच्या मध्ये अडकला. यात त्याच्या छातीला गंभीर जखमा होऊन त्याचा मृत्यू झाला.



**उलवे : भाजप युवा मोर्चाचे उलवे नोड अध्यक्ष धीरज ओवाळेकर यांनी वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी निलेश खारकर, वितेश म्हात्रे, सुहास गोंधळी, अभिमन्यू दापोलकर, दीपक गोंधळी, नाथाशेठ ओवळेकर, भरत म्हात्रे, राहुल म्हात्रे आदी उपस्थित होते.**

# स्वस्तिका घोषला शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील प्रतिष्ठित अशा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिला सन्मानित करण्यात आले. बालेवाडी येथे राज्यपाल सी पी राधाकृष्ण यांच्या उपस्थितीत आज झालेल्या सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्वस्तिकाला पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्वस्तिकाला मिळणारा पुरस्कार पनवेलकरांसाठी अभिमानाची बाब ठरली असून तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.



पुण्यातील बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात राज्यपाल सी पी राधाकृष्ण यांच्या उपस्थितीत झालेल्या या समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, पणन व राज शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, आमदार उमा खापरे, आमदार अमित बोरखे, अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, क्रीडा आयुक्त हिरालाल सोनावणे आदींची उपस्थिती होती.

आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वस्तिका घोष ही जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी कॉलेजची विद्यार्थिनी आहे. खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलमध्ये स्वस्तिकाने इयत्ता तिसरी ते बारावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर आता ती खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) बीएमएसचे शिक्षण घेत आहे. स्वस्तिकाने देशात व परदेशात झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले आहे. गेल्या दहा वर्षांपासून ती महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करीत आहे. खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये ती दररोज सहा तास खेळाचा सराव करीत असते. स्वास्तिकाचे वडील संदीप घोष हे या खेळातील प्रशिक्षक आणि सल्लागार आहेत. टेबल टेनिससाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाला वेळोवेळी आर्थिक मदत करण्याबरोबरच प्रशिक्षणासाठी खारघर येथील विद्यालयात विशेष सोय केली आहे. स्वस्तिकाच्या या यशाचे संपूर्ण श्रेय जनार्दन शिक्षण प्रसारक संस्था, लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जात असल्याची प्रतिक्रिया संदीप घोष यांनी देत त्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे त्यांनी आभारही व्यक्त केले.

### अभिमानास्पद!

पनवेलच्या स्वस्तिका घोषने शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळवून संपूर्ण पनवेलकरांचे नाव उज्ज्वल केले. टेबल टेनिसमध्ये तिचं सातत्याने दिलेले योगदान, देश-विदेशातील कामगिरी आणि कठोर मेहनतीचा परिणाम म्हणजे हा पुरस्कार! स्वस्तिकाचा प्रवास केवळ खेळाडू म्हणूनच नव्हे, तर विद्यार्थिनी म्हणून खूप प्रेरक आहे. शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंत शिक्षणात आणि खेळातही समतोल राखणं हे सोपं काम नाही. या वाटचालीत तिच्या वडिल व प्रशिक्षक, शाळा-महाविद्यालयाचा आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा पाठिंबा खूप मोलाचा ठरलेला आहे.





**पनवेल : भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस अमरीश मोकल यांचा वाढदिवस शुक्रवारी साजरा झाला. यानिमित्ताने त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अमरीश मोकल यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच नवीन गाडी घेतल्याबद्दल अभिनंदन केले. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणिस प्रल्हाद केणी, शहर उपाध्यक्ष केदार भगत, नितीन वास्कर, अनिल कोकाटे उपस्थित होते.**

## तृतीयपंथी बनून भिती दाखवणारे त्रिकूट ताब्यात



**पनवेल : वार्ताहर**

साडी घालून तृतीयपंथी असल्याचे भासवून जबरदस्तीने तक्का येथील एका घरात घुसून आपसात संगनमत करून त्या घरातील परिवारास दुखापत करण्याची भिती दाखविणार्या त्रिकुटास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

शहरातील तक्का परिसरात ही घटना घडली असून याबाबतची माहिती पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.शाकीर पटेल, पो.उपनि.प्रियांका शिंदे, बीट मार्शल व अंमलदार हे त्वरित घटनास्थळी पोहोचले व त्यांनी या त्रिकुटाला ताब्यात घेतले.

चौकशीमध्ये या त्रिकुटाने आपण तृतीयपंथी नसून पुरुष असल्याचे सांगितले व उदरनिर्वाहासाठी गेल्या काही महिन्यापासून साडी परिधान करून तृतीयपंथी असल्याचे भासवून पैसे जमा करत असल्याचे सांगितले. याबाबत पनवेल शहर पोलिसांनी सतीश व्यंकट करमुळे (४५), किरण सिताराम विभुते (३५) व सुनील यल्लाप्पा मुळे (२३) यांना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरू आहे.

# स्वप्नपूर्ती घरांचा आनंददायी सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आशियाना ग्रुपच्या वतीने पनवेल तालुक्यातील हरिग्राम येथील त्यांच्या महत्त्वाकांक्षी पनवेल प्राईड गृहनिर्माण प्रकल्पामध्ये शुक्रवारी (दि. १८) स्वप्नपूर्ती घरांचा आनंददायी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात अनेक फ्लॅटधारकांना त्यांच्या स्वप्नातील घरांची चावी सोपविण्यात आली.



या कार्यक्रमाचे उदघाटन भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी आशियाना ग्रुपच्या दर्जेदार गृहनिर्माण प्रकल्पांचे कौतुक केले आणि घर खरेदी करणाऱ्या भाग्यवान कुटुंबांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या माध्यमातून इच्छुक खरेदीदारांना पनवेल प्राईड प्रकल्पाची सविस्तर माहिती देण्यात आली तसेच या प्रकल्पाची वैशिष्ट्ये आणि उपलब्ध सुविधा याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

या सोहळ्याला भाजपचे तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, शुभम पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.





**पनवेल : भारतीय जनता पक्षाचे सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील यांचा वाढदिवस शुक्रवारी साजरा झाला. यानिमित्ताने भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी राजेश पाटील यांना शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव तसेच महेश पाटील, उदय म्हस्कर यांच्यासह इतर उपस्थित होते.**

## संपादकीय

# विनाकारण वादंग

येत्या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्रात इंग्रजी व मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी अनिवार्य असेल असा निर्णय जाहीर होताच त्यावर उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त करून वादंग निर्माण करण्यात आला आहे. हिंदी ही संपर्कसूत्राची भाषा होऊ शकते. त्यामुळे ती शिकवण्याचा प्रयत्न आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

**शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवण्याच्या हेतूने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आखण्यात आले असून त्याची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून शालेय स्तरावर करण्यात येणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून पहिलीसाठी नवा अभ्यासक्रम असेल, तसेच इंग्रजीबरोबरच मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य असेल असा शासन निर्णय शालेय शिक्षण विभागाने बुधवारी जारी केला. यानुसार मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये पहिली ते पाचवी इयत्तांमध्ये हिंदी अनिवार्य असणार आहे. इतर भाषांचे माध्यम असणाऱ्या शाळांमध्ये त्या माध्यम भाषेसह मराठी आणि इंग्रजी अनिवार्य असेल. वास्तविक आधीपासूनच महाराष्ट्रात शालेय पातळीवर हिंदी शिकवली जात आली आहे. आता ती पहिलीपासून सक्तीची असेल एवढाच बदल आहे. तरीही हिंदीवरून वादंग निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली यासंदर्भातील भूमिका विशद केली. महाराष्ट्रात प्रत्येकाला मराठी आलीच पाहिजे हा आपला आग्रह आहे. मात्र देशात संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिंदी ही एक भाषा आहे. ती संपर्कसूत्राची भाषा होऊ शकते. त्यामुळे हिंदी शिकली पाहिजे असा आमचा प्रयत्न आहे असे फडणवीस यांनी सांगितले. वास्तविक दक्षिणेतल्या सारखा हिंदीविरोध महाराष्ट्रात कधीही झालेला नाही. शाळकरी विद्यार्थ्यांपासून सर्वसामान्यांपर्यंत हिंदीचा स्वीकार सहजपणे झालेला आहे. आता नव्या शिक्षण धोरणाअंतर्गत पहिलीपासून हिंदी भाषेची सक्ती करण्यात येणार असल्याचे जाहीर होताच मात्र महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने त्याविरोधात आक्रमक पवित्रा घेतला. राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार यांनी मनसेच्या या भूमिकेवर टीका केली. राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा नीट अभ्यास करून मनसेने याबाबत बोलावे असे त्यांनी सुचवले. मुंबईत मराठी भाषेचा सन्मान होईल याची काळजी राज्य सरकार घेत आहे हेही त्यांनी नमूद केले. परंतु त्यानंतरही शुक्रवारी मनसेकडून हिंदी भाषेच्या सक्तीविरोधात आंदोलन करण्यात आले. काही ठिकाणी यासंदर्भातील शासकीय आदेशाची होळी करण्यात आली तर कुठे हा आदेश फाडण्यात आला. हिंदी भाषेची सक्ती दक्षिणेच्या राज्यांत का नाही, असाही प्रश्न त्या पक्षाकडून करण्यात आला. दक्षिणेतील तामिळनाडूसारख्या राज्यात कायमच हिंदीविरोधाचे राजकारण केले गेले आहे. आताही तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन हे मतांवर डोळा ठेवून हिंदीविरोधाचे कार्ड गेले काही दिवस खेळत आहेत. परंतु महाराष्ट्रात त्या स्वरूपाचा हिंदीविरोध कधीही झालेला नाही. असे असताना निव्वळ राजकीय पोळी भाजण्यासाठी इथेही हिंदी विरोधाचा हा घाट चालवला जातो आहे का, असा प्रश्न कुणालाही पडावा. देशातील सर्वाधिक राज्यांमध्ये बोलली आणि समजली जाणारी हिंदी भाषा शिकायला खरेच हरकत का असावी? नवे शैक्षणिक धोरण ठरवताना यासंदर्भात सखोल विचारविनिमय करूनच पहिलीपासून हिंदी शिकवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या धोरणाचा नीट अभ्यास न करता त्याअंतर्गत घेतल्या जाणाऱ्या निर्णयांना विरोध करणे हे विद्यार्थ्यांचेच नुकसान करणारे ठरेल. त्यामुळे राज्य सरकारने विद्यार्थीहिताच्या निर्णयावर ठाम राहणेच योग्य ठरेल.**

# स्वातंत्र्यसैनिक डॉ. उत्तमराव पाटील



महान स्वातंत्र्यसेनानी डॉ. उत्तमराव गिरधर पाटील यांची आज जयंती. उत्तमराव अर्थात नानासाहेब पाटील ही राज्यच नव्हे, तर देशपातळीवरच्या राजकीय पटलावरील बडी आसामी. जळगाव जिल्ह्यातील मळगाव हे छोटेसे खेडे जन्मभूमी असली तरी कर्मभूमी म्हणा वा कार्यक्षेत्राने धुळ्यासह अवघा महाराष्ट्र त्यांनी व्यापून टाकला. जनसंघाचे पाईक म्हणून कार्याला सुरुवात केली अन् हयातभर त्याच भूमिकेत वावरताना सर्वोत्तम स्वयंसेवक म्हणून नावारूपाला आले.

धुळे जिल्ह्याची मागास जिल्हा म्हणून पूर्वापार ओळख. हा जिल्हा काँग्रेसवाल्यांचा पारंपरिक बालेकिल्ला म्हणूनही सर्वदूर ओळख प्रस्थापित करता झाला. अशा या जिल्ह्यामध्ये प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जात तेव्हाच्या जनसंघाचे वा आताच्या भाजपचे अन् पर्यायाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम आदिवासी पट्ट्यात म्हणजेच तळागाळापर्यंत नेण्याची महत्तम कामगिरी नानासाहेबांनी केली. पक्ष, संघटना, त्यात तळमळीने कार्यरत असणारा प्रत्येक लहान-मोठा कार्यकर्ता, त्याचे सुख-दु:ख समजून घेणारा तसेच प्रसंगी त्याच्या मदतीला धावून जाणारा नेता म्हणून नानासाहेबांची ओळख राहिली. नानासाहेबांच्या परीसस्पर्शामुळे अनेकांच्या राजकीय जीवनाचे सोने झाले. ऐंशीच्या दशकामध्ये भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले अध्यक्ष झालेले उत्तमराव पाटील यांनीच १९८४मध्ये पक्षाच्या अध्यक्षपदाची सूत्रे मुंडे महोदयांकडे सुपूर्द करतानाच यापुढे पक्षात कोणतेही पद न घेण्याचा निर्धारही जाहीर केला होता. त्या निर्णयावर नानासाहेब अखेरपर्यंत ठाम राहिले.

जळगाव जिल्ह्याच्या भडगाव तालुक्यातील मळगाव नानासाहेबांचे जन्मगाव. बडोदा संस्थानाच्या साहाय्याने उच्च शिक्षण घेतले. वकील झाले आणि नंतर धुळ्यातील नावाजलेले फौजदारी वकील म्हणून ओळखले जाऊ लागले. भारतीय जनसंघाचे धुळे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. १९५४मध्ये जनसंघाच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आली. पुढच्या सहा वर्षांतच नानासाहेब जनसंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि १९७७च्या सुमारास जनसंघाच्या राष्ट्रीय अध्यक्ष या सर्वोच्च पदावर आरूढ झाले होते. साधारणपणे १९५४मध्ये ते पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेचे सदस्य झाले. नानासाहेब १९५७मध्ये खासदार झाले होते. १९७८मध्ये महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य झाल्यावर विरोधी पक्षनेतेपद त्यांच्याकडे चालून आले. १९८०मध्ये भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले अध्यक्ष म्हणूनही नानासाहेबांचीच निवड झाली. पुढे १९८९मध्ये जळगाव जिल्ह्याच्या एरंडोल लोकसभा मतदारसंघातूनही खासदार म्हणून निवडून गेले होते.

महाराष्ट्र विधान परिषदेतील विरोधी पक्षनेता यासारख्या अत्यंत जबाबदारीच्या पदावर जवळपास एक तपापर्यंत कार्यरत असताना, राजकारण हे लोकहितासाठीच असते या मुद्द्यावर अढळ श्रद्धा असणाजया उत्तमराव पाटलांनी राजकारण्यांनी कुठे थांबले पाहिजे याचा एक वस्तुपाठच कृतीतून घालून दिला. त्यानुसार १९९१मध्ये नानासाहेबांनी वैधानिक राजकारणातून निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली. (साभार : इंटरनेट)

# प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक



ताराबाई मोडक या प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या प्रवर्तक. ताराबाई या चाकण (जि. पुणे) येथील केळकर घराण्यातील. त्यांचा जन्म १९ एप्रिल १८९२ रोजी मुंबई येथे झाला. वडिलांचे नाव सदाशिवराव व आईचे उमाबाई. वडील सुबोध पत्रिका या साप्ताहिकाच्या संपादनाबरोबरच हितोपदेश, कामगार ही साप्ताहिक आणि ज्ञानदीप हे मासिक चालवत असत. आईही स्त्री शिक्षण, विधवा विवाहासाठी काम करत असे. बुद्धिमान व सुधारणावादी आईवडिलांमुळे ताराबाईंकडे बुद्धिमत्तेचा वारसा आला. १९१४ मध्ये ताराबाई मुंबई विद्यापीठातून बी. ए. झाल्या. त्यांनी कृष्णा वामनराव मोडक यांच्याशी १९१५ मध्ये नोंदणी पद्धतीने प्रेमविवाह केला. त्याला दोन्ही घरच्या लोकांचा विरोध होता.

ताराबाईंनी १९२२ मध्ये राजकोट येथे बार्टन फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये लेडी सुपरिटेंडन्ट म्हणून रुजू झाल्या. या पदावर काम करणार्या त्या पहिल्या भारतीय महिला होत. त्यानंतर त्यांनी गिजुभाई बधेका यांच्या साह्याने भावनगर येथे मॉंटेसरीच्या तत्त्वांवर आधारलेली 'गीता शिक्षण पद्धती' निश्चित केली. हाच ताराबाईंच्या बालशिक्षण कार्याचा प्रारंभ होय. शिक्षणाचा खरा पाया मुलांच्या बालवयातच घातला जाण्याची शक्यता व आवश्यकता असते, या दृष्टीने त्यांनी पूर्वप्राथमिक शिक्षणाचे नवीन पाऊल टाकले. १९२३-१९३२ ही नऊ वर्षे त्यांनी भावनगरच्याच दक्षिणामूर्ती शिक्षणसंस्थेत प्राध्यापिका म्हणून काम केले. १९३३ पासून त्यांनी शिक्षणाबाबतची शिक्षणपत्रिका काढायला सुरुवात केली. १९३६ साली त्यांनी नूतन बालशिक्षण संघाची स्थापना केली. पुढे बालशिक्षणाचे हे लोण महाराष्ट्रात पसरले. १९३६-१९४८ या काळात त्यांनी मुंबई-दादरच्या हिंदू कॉलनीत शिशुविहार नावाची संस्था स्थापन करून बालशिक्षणाचे प्रसारकार्य केले. या संस्थेने पुढे पूर्वप्राथमिक अध्यापन मंदिर सुरू केले. यातून मराठी आणि गुजराती या दोन्ही भाषांच्या हजारांहून अधिक शिक्षक-शिक्षिकांचे प्रशिक्षण झाले.

ताराबाईंनी गिजुभाईंच्या मृत्यूनंतर पुढील १२ वर्षे नूतन बालशिक्षण संघाची धुरा वाहिली. ग्रामीण भागात बालशिक्षणाचा प्रसार करणे हे या संघाचे काम होते. खेड्यांमध्ये शास्त्रीय पद्धतीने मात्र कमी खर्चात बालवाड्या चालविण्यासाठी १९४५ मध्ये ताराबाईंनी ठाणे जिल्ह्यातील बोर्डी येथे ग्राम बालशिक्षा केंद्र स्थापिले. या संस्थेतूनच ग्रामीण बालवाडी व ग्राम बाल अध्यापन मंदिर या संस्था निघाल्या. या संस्थांचा लाभ आदिवासी मुलांना मिळावा, म्हणून त्यांच्या आदिवासी परिसरात आणि अंगणात बालवाडी चालविण्याचा उपक्रम करण्यात आला. प्राथमिक शाळेत मुलांची अनुपस्थिती हा गंभीर प्रश्न होता. मुले शाळेत हजर राहावीत म्हणून ताराबाईंनी गृहभेटी, प्रचार फेर्या, दिंडी, मुलांसाठी बैलगाडीची सोय, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविले. त्याचबरोबर भातशेती ह्या मूलोद्योगाच्या माध्यमातून विज्ञान, गणित, भाषा हे विषय शिकविण्याचा प्रयत्न केला.

यामुळे मुलांना शिक्षण घेण्यात गोडी देखील वाटू लागली. शहराच्या ठिकाणाहून कोणतेही शैक्षणिक साधने न आणता त्यांनी विद्यार्थ्यांना रंग, स्पर्श, वजन मापन, अंक, आकार इत्यादी संकल्पना समजावे यांकरिता पिसे, बांगळ्या, शंख, दगड, बिया, माती, रेती, बांबुफळे, डब्या इत्यादी स्थानिक वस्तूंचाच वापर केला. ताराबाईंच्या आयुष्याची चित्तरकथा जितकी विलक्षण आहे, तितकीच ती त्यांच्याविषयीचा आदर दुणावणारी आहे. पावलोपावली भिडणारी प्रतिकूल परिस्थिती त्यांनी संकट म्हणून न स्वीकारता संधी म्हणून स्वीकारली आणि निव्वळ मार्गच काढला नाही, तर त्यातून सुंदर संकल्पना घडवल्या. वैयक्तिक होरपळीचे प्रतिबिंबना कधी त्यांच्या स्वभावावर,ना व्यक्तिमत्त्वावर आणिना कधी त्यांच्या कार्यावर पडले.

ताराबाईंची कर्मभूमी ठाणे जिल्ह्यातली असली, तरी त्यांच्या कार्याने फक्त तेवढ्याच भागाला फायदा झाला नाही, तर त्यांचे कार्य खेड्यातील आणि आदिवासी भागातील बालशिक्षण तंत्राचे एक देशव्यापी 'मॉडेल' बनले. पद्मभूषण ताराबाई मोडक यांचे ऑगस्ट ३१ इ.स. १९७३ला मुंबईत निधन झाले. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### ओपन एआयची इमेजसह विचार करणारी मॉडेल्स

ओपन एआय ओ ३ आणि ओ ४ ही नवी दोन मॉडेल्स आता चॅटजीपीटी प्लसच्या उपलब्ध झाली आहेत. या दोन्ही फिचर्समुळे एआय आता इमेज म्हणजेच फोटोसह विचार करु शकणार आहे. तसंच या दोन फिचर्सचा उपयोग कोडिंगसाठीही केला जाऊ शकणार आहे.



कृत्रीम बुद्धिमता हा विषय चर्चेचा ठरतोच आहे, या शिवाय आता ही दोन मॉडेल्स फोटोंसह विचार करु शकणार आहेत.

**नवी दोन मॉडेल्स कसं काम करणार?**

शैक्षणिक आणि इतर डोमेनमधील कठीण कार्ये हाताळण्याची क्षमता असलेलं ओपनएआय आता ओ ३ या मॉडेलमध्ये असणार आहे. आजवरचं सक्षम मॉडेल म्हणून याकडे पाहिलं जातं आहे. तर ओ ४-मिनी विविध पर्याय उपलब्ध करुन देणारं फिचर आहे. वेब ब्राऊझिंग असो किंवा इमेज जनरेशन दोन्ही एकाच सेशनमध्ये आता करता येणार आहे. एवढंच नाही तर ओ ३ आणि ओ ४ ही दोन्ही फिचर्स रेखाचित्रं, आकृत्या, कमी गुणवत्ता असलेले फोटो कुठले हे सगळं सांगू शकणार आहेत. त्यामुळे या दोन्ही मॉडेल्सचा वापर युजर्सकडून मोठ्या प्रमाणावर होईल यात शंका नाही.

**कोडेक्स नावाचं फिचरही चर्चेत**

जीपीटी-४ ओ हे गेल्या वर्षी ऑडिओ, व्हिजन आणि टेक्स्टवर रिअल-टाइम रीझनिंग करणारे प्रमुख मॉडेल म्हणून सादर झालं होतं. माहितीनुसार, ओपनएआय जीपीटी-४.१ सोबतच त्याच्या छोट्या जीपीटी-४.१ मिनी आणि नॅनो आवृत्त्या या आठवड्यात जाहीर होणार होत्या ज्या झाल्या आहेत.

टूल इंटिग्रेशन करुन ही दोन मॉडेल्स आणण्यात आली आहेत. या मॉडेल्ससह ओपन एआयने Codex CLI हे कोडिंगशी संबंधित फिचरही आणलं आहे. हे फिचर ओ ३ आणि ओ ४ ला सपोर्ट करेल. त्यानंतर हे टूल लवकरच जीपीटी ४.१ लाही सपोर्ट करणार आहे. आता या नव्या तंत्रज्ञान प्रणालीमध्ये आणखी काय काय अपडेट मॉडेल येणार ते पाहणंही महत्त्वाचं असणार आहे. सीएनबीसीने हे वृत्त दिलं आहे.

# भारतीय क्रांतिकारक अनंत कान्हेरे



**निमित्त**

अनंत लक्ष्मण कान्हेरे हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक सशस्त्र क्रांतिकारक होते. ते गणेश दामोदर सावरकर आणि विनायक दामोदर सावरकर यांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'अभिनव भारत' या क्रांतिकारक संघटनेचे सदस्य होते. नाशिकचा कलेक्टर ए.एम.टी. जॅक्सन याची हत्या करणारे अनंत कान्हेरे हे खुदीराम बोस यांच्यानंतरचे सर्वांत तरुण वयाचे भारतीय क्रांतिकारक ठरले. अनंत कान्हेरे यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया...

अनंत कान्हेरे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील आयनी मेटे या गावात ७ जानेवारी १८९२ रोजी झाला. त्यांना दोन बहिणी आणि दोन भाऊ होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण इंदूर येथे तर माध्यमिक शिक्षण औरंगाबाद येथे झाले. १त्यांच्या मोठ्या भावाचे नाव गणपतराव आणि धाकट्या भावाचे नाव शंकरराव होते.

कान्हेरे १९०३मध्ये आपल्या काकांकडे पुढील शिक्षणासाठी औरंगाबादला गेले. त्यांचे भाऊ गणपतराव बार्शी येथे राहत होते. त्यांच्याकडे काही काळ राहून १९०८मध्ये ते पुन्हा औरंगाबादला परत गेले. तेव्हा ते गंगाराम रुपचंद श्रॉफ यांच्या घरात भाड्याने राहत असत. गंगाराम यांचा येवल्यात टोणपे नावाचा एक मित्र होता. त्या काळात अनेक गुप्त क्रांतिकारी संस्था कार्यरत होत्या. नाशिकमधील एका गुप्त संस्थेचा टोणपे हे सदस्य होते. गणू वैद्य आणि गंगाराम एकदा नाशिकमधील गुप्त क्रांतिकारी संस्थेसाठी शस्त्रे खरेदी करण्यासाठी केले होते. या वैद्यांशी कान्हेरे यांची ओळख झाली. नंतर कान्हेरे यांनी त्या दिवसातील मैत्रीबद्दल 'मित्र प्रेम' नावाची कादंबरी लिहिली. कान्हेरे क्रांतिकारी गटांच्या कार्याकडे आकर्षित झाले. सावरकर बंधूनी नाशिक येथे अभिनव भारत संस्थेची स्थापना केली होती. कृष्णाजी गोपाळ कर्वे यांनी बाबाराव सावरकरांच्या मार्गदर्शनाखाली अशाच एका गुप्त गटाची स्थापना केली होती.

या संस्थेचे दुसरे सदस्य विनायक नारायण देशपांडे होते. सावरकर बंधू, मदनलाल धिंग्रा यांच्याकडून स्फूर्ती घेऊन अनंत कान्हेरे ह्यांनी नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याला ठार मारण्याचे ठरविले. त्याला कृष्णाजी गोपाळ कर्वे आणि विनायक नारायण देशपांडे अशा समवयस्क साथीदारांची जोड मिळाली.

जॅक्सनची मुंबई येथे वरच्या पदावर बदली करण्यात आली. त्याला नाशिक येथेच मारणे जास्त सोपे होते. २१ डिसेंबर १९०९ या दिवशी नाशकातल्या विजयानंद थिएटरमध्ये 'शारदा' या नाटकाचा प्रयोग जॅक्सनच्या निरोप समारंभासाठी ठरला होता. जॅक्सन मराठी भाषेचा आणि नाटकांचा चाहता असल्याने या प्रयोगास येणार होताच. नाटकाचा प्रयोग सुरू होण्याची वेळ झाली, सर्वजण आपापल्या जागेवर स्थानापन्न होत असताना अनंत कान्हेरे ह्यांनी जॅक्सनवर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. जॅक्सन जागीच ठार झाला. अनंत कान्हेरे आपल्या जागेवरच शांतपणे उभे राहिले, त्यांना अटक करण्यात आली. कान्हेरे, कर्वे आणि देशपांडे यांच्यावर खटला भरण्यात आला.

२० मार्च १९१० रोजी तिघांनाही फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. १९ एप्रिल १९१० या दिवशी तिघांनाही ठाण्याच्या तुरुंगात फाशी देण्यात आले. ठाण्याच्या तुरुंगात अनंत कान्हेरे यांचे स्मारक आहे. नाशिकमध्ये 'अनंत कान्हेरे' नावाचे क्रिकेटचे मैदान आहे. (साभार : विकिपीडिया)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### दररोज ब्रेड खाल्ल्यास आरोग्यावर गंभीर परिणाम

दुपारच्या जेवणानंतर सामान्यपणे अनेकांना झोप येते. पोटभर जेवण झाल्या झाल्या डोळे जड होऊ लागतात आणि गुंगी येते. उन्हाळ्यात तर असं अधिकच होतं. घरी असलेल्या लोकांचं ठीक आहे ते झोप घेऊ नही शकतात, पण ऑफिसमधील लोकांची समस्या होते.



दुपारच्या जेवणानंतर ऑफिसमध्ये लॅपटॉप किंवा कॉम्प्युटरवर डोळे टिकवून ठेवणं किंवा कामावर फोकस करणं अवघड होऊन बसतं. बरेच लोक तर बसल्या बसल्या डुलकी मारू लागतात. जर तुमच्यासोबतच असं होत असेल तर ही समस्या कशी दूर करावी हे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

दुपारच्या जेवणानंतर येणारी झोप पळवण्यासाठी काय करावं याबाबत न्यूट्रिशनिस्ट रयान फर्नांडो यांनी त्यांच्या इन्स्टाग्रामवर एका व्हिडिओत माहिती दिली आहे. डॉक्टरांनी सांगितलं की, 'दुपारच्या जेवणानंतर येणाऱ्या झोपेला Post-Lunch Dip असं म्हटलं जातं. असं जास्त जड जेवण केल्यानं होतं'.

न्यूट्रिशनिस्टनुसार 'अनेकदा लोक दुपारच्या जेवणात भात, तेलकट भाज्या किंवा काही गोड खातात. हे सगळं खाल्ल्यानं आपला ब्लड फ्लो पचनासाठी पोटाकडे शिफ्ट होतो आणि मेंदुला ऑक्सीजन कमी मिळू लागतं. तसेच या स्थितीत इन्सुलिन वाढतं, ज्यामुळे मेलाटोनिन आणि सेराटोनिन नावाचे नॅचरल स्लीप हार्मोन्स ॲक्टिव होतात. स्लीप हार्मोन ॲक्टिव झाल्यानं तुम्हाला झोप येऊ लागते'.

**कशी पळवाल झोप?**


डॉक्टरांनी सांगितलं की, 'जेवणानंतर येणारा आळस आणि झोपेला सहजपणे कंट्रोल करत येऊ शकतं. यासाठी तुम्हाला तुमच्या दुपारच्या जेवणात थोडासा बदल करावा लागेल. दुपारच्या जेवणात प्रोटीन आणि फायबर असलेल्या गोष्टींचा समावेश करावा'.

न्यूट्रिशनिस्टनुसार तुम्ही दुपारच्या जेवणात ग्रिल पनीर, सलाद, ब्राउन राइस खाऊ शकता. तसेच दुपाच्या जेवणानंतर ५ ते १० मिनिटं आवर्जुन वॉक करा. असं केल्यानं शरीराला लगेच एनर्जी मिळेल आणि तुम्ही तुमचं काम अधिक वेगानं करू शकाल. ही एक छोटीशी ट्रिक तुमची दुपारची झोप उडवण्यात मदत करू शकते. तेव्हा वर सांगितलेले एकदा करून बघा.

# कुडे लेणी, तळगड पाहण्यासाठी पर्यटकांची वर्दळ वाढली

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील कुडालेणी व तळगड, पाहण्यासाठी पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या तळा भूमीत ऐतिहासिक महत्त्व असाणाऱ्या पर्यटनाच्या दृष्टीने पाहण्यासारखी अनेक ठिकाणे आहेत. त्यापैकी प्रसिद्ध कुडे लेणी व तळगड किल्ला असून या परिसरात एक निसर्गाचा मोठा साठा आहे.विविध पक्षी, प्राणी वृक्षलता पहावयास मिळतात. कुडे लेणी येथील कोरीव काम व शिल्पकला पहाण्यासारखी



आहे. ही दोन्ही पर्यटनस्थळे पहाण्यासाठी पर्यटक वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.
या कुडेलेणी येथे २६ लेण्या असून तळमजल्यावर १५ व पहिल्या मजल्यावर ११ अशा लेण्या आहेत. ६ नंबरच्या लेणीत शिलालेख आहेत.बाहेर दोन्ही बाजूला दोन हत्ती सुंदर कोरीव काम करून दगडात खोदलेले आहेत.परंतु एक हत्ती पूर्णपणे नष्ट झालेला असून एका हत्तीची सोंड नष्ट होत आली आहे.आतमधे कलाकुसर कोरलेली असून भिंतीचित्रे दिसत आहेत. ६ ते १७ लेण्यांमध्ये स्तूप आहेत. एकूण अंदाजे ३१ स्तूप आहेत. लेणीमधे ५ चैत्य व २१ विहार आहेत.लेण्यांमधील शिलालेखांचे वाचन झाले आहे.
पर्यटकांचे सध्या कुडेलेणी हे आकर्षण ठरत असून पर्यटकांमधे वाढ होताना दिसत आहे.

# कळंबोलीवाडीला नव्या पुलाची प्रतीक्षा

## फरशीचा पूल वाहून गेल्याने आदिवासींचा प्रवास धोकादायक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातून वाहणाऱ्या पेज नदीमध्ये कळंबोलीवाडीपासून कवठेवाडी कडे जाण्यासाठी फरशी बनविण्यात आली होती. त्या फरशी पुलाचा काही भाग वाहून गेला आहे. त्यामुळे या दोन्ही वाड्यांचा वहिवाटीचा रस्ता बंद झाला आहे. त्या फरशी पुलाच्या जागी नवीन पूल बांधल्यास या दोन्ही वाड्यांमधील आदिवासी लोकांना इच्छितस्थळी पाच मिनिटात पोहचता येणार आहे. माजी आमदार सुरेश लाड यांनी त्या ठिकाणी पूल बांधण्यात यावा. यासाठी त्यांच्या आमदारकीच्या काळात प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाला करण्यात आल्या होत्या, मात्र त्यावर अद्याप कार्यवाही झाली नाही.



बारमाही वाहणाऱ्या पेज नदीवर नसरापूर ग्रामपंचायतीमधील कळंबोली आणि कशेळे ग्रामपंचायतीतील कवठेवाडी या दोन गावांना जोडणारा बांधलेला फरशी पूल होता. कळंबोलीवाडीच्या गणेश घाट येथे असलेली फरशी पूल निकामी झाला असून पावसाळ्यात महापुरात फरशी पुलाचा काही भाग वाहून गेल्याने या फरशी पुलाचा वापर स्थानिकांना करता येत नाही. त्यात या दोन्ही आदिवासीवाड्या वेगवेगळ्या ग्रामपंचायतीमधील असल्या तरी त्या दोन्ही वाड्यांच्या मध्ये केवळ नदी असून फरशी पूल तुटल्याने दोन्ही वाड्यांमधील आदिवासी ग्रामस्थांचे येणे-जाणे जवळपास बंद झाले आहे.

या दोन्ही आदिवासीवाडीमधील लोकांना एकमेकांचे गावी जायचे असल्याने कळंबोलीवाडीमधून अंजप येथे तेथून नेरळ कशेळे राज्यमार्ग रस्त्याने कवठेवाडी येथे जावे लागते. रस्ता मार्गाने सध्याचे हे अंतर साधारण आठ किलोमीटर असून येऊन जाऊन हे अंतर साधारण १५ किलोमीटर होत असल्याने स्थानिक लोक आर्थिक परिस्थितीमुळे जाण्याचे टाळू लागले आहेत.

या आदिवासीवाडचा पुन्हा जोडण्यासाठी शासनाने तात्पुरत्या स्वरूपात त्या फरशी पुलाची दुरुस्ती करणे गरजेचे आहे. फरशी पुलाची दुरुस्ती केल्यास स्थानिकांची नदी पार करण्याची सोय होऊ शकते. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला फारसा खर्चदेखील येणार नाही आणि पावसाळा वगळता आठ महिने त्या फरशी पुलाचा वापर करता येऊ शकतो अशी सूचना स्थानिक ग्रामस्थ राम कोंडू नाईक यांनी केली आहे.

आमच्या आदिवासी लोकांसाठी रस्ता तयार कार्याला शासनाला वेळ नाही, अशी खंत लक्ष्मण हिलम यांनी व्यक्त केली आहे.

### माजी आमदार सुरेश लाड यांच्याकडून प्रयत्न

कर्जतचे माजी आमदार सुरेश लाड यांनी कवठेवाडी आणि कळंबोलीवाडी यांना जोडणाऱ्या फरशी पुलाच्या जागी नवीन पूल बांधण्यात यावा यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला केले होते. त्यानंतर बांधकाम विभाग यांच्याकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही आणि त्यामुळे आदिवासी लोकांचा रस्ता पुलाअभावी बंद झाला आहे.




**पोलादपूर : मुंबई येथे बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवातर्फे आयोजित केलेल्या वकिलांच्या विभागीय परिषदेमध्ये १८ एप्रिल २०२५ रोजी महाड वकील संघाचे जेष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. उदय रामचंद्र देशमुख, यांचा केंद्रीय विधी आणि न्याय राज्यमंत्री मेघवाल, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक आराधे व अन्य मान्यवर तसेच बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाचे अध्यक्ष अ‍ॅड. पासबोला साहेब व पदाधिकारी, ठिकठिकाणचे वकील व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत 'सिनियर लॉयर' म्हणून सत्कार करण्यात आला.**

# गोरेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जनसेवेचा गौरव



**माणगाव : बातमीदार**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती पंचशील बौद्धजन सेवा संघ गोरेगाव विभाग यांनी ७५ वर्षाची परंपरा राखत संघाचे अध्यक्ष आयु विकास गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली साजरी केली. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराना अभिप्रेत असलेल्या जनकल्याण व मानवता या करिता संविधानाची काटेकोरपणे अंमलबजावणी करीत प्रामाणिकपणे जनसेवा करणाऱ्या माणगाव तालुक्यातील प्रशासकीय अधिकारी यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

यामध्ये माणगाव तालुक्यातील पोलिस उप अधीक्षक सूर्यवंशी यांना सन्मानित करण्यात आले. गोरेगाव पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांनी गोरेगाव पोलिस स्टेशनचे सुशोभिकरण करून सौंदर्यीकरण करून आपल्या पोलीस कर्मचाऱ्यांना जीवनावक्षक सोई सुविधा उपलब्ध करून दिल्या बदल त्यांना सन्मानित करण्यात आले. गोरेगाव ग्रामपंचायत ग्राम विकास अधिकारी प्रभाकर पालेकर ,सैनिकी सेवेत ३२ वर्ष यशस्वी सेवा करून सुभेदार मेजर पदावरून सेवा निवृत्त झालेले महार बटालियन चे वीर गावचे सुपुत्र आयु सुजित भीमराव हाटे व त्यांची पत्नी सिमरन हाटे यांचादेखील सत्कार करण्यात आला.

माणगाव तालुक्यातील गटशिक्षण अधिकारी सुरेखा तांबट यांनी संविधान अभियान माणगाव व तळा तालुक्यात यशस्वी राबविल्या बद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. गोरेगावचे सुपुत्र पेट्रोल पंप व्यावसायिक प्रीतम गायकवाड, शेतीमध्ये सोन पिकवून कलिंगड परदेशात विक्री करून शासनाचे शेतीनिष्ठ व इतर पुरस्कार प्राप्त करणारे रोहन साळवी यांचा सत्कार कारण्यात आला.

गोरेगावचे प्रसिद्ध उद्योजक, आरपीआय नेते अमित कांबळे यांच्या हस्ते धम्म ध्वज फडकवला गेला. धम्म वंदना बौद्ध महासभेच्या जिल्हा अध्यक्ष अस्मितातार्ई जाधव यांच्या नेतृत्वाखाली बौद्ध उपासक अनिता महाडिक व साक्षी गायकवाड यांनी घेतली. बौद्धजन पंचायत समितीचे अध्यक्ष चंद्रमणी साळवी, पंचशील बौद्ध जन सेवा संघ मुंबई प्रदेशचे अध्यक्ष संतोष जनार्दन साळवी, पंचशील महिला सेवा संघाच्या अध्यक्षा सुप्रिया साळवी आणि जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रोहन अशोक साळवी व सर्व विश्वस्त यांनी नेतृत्वखाली जयंती कार्यक्रम झाला.

अभिवाद सभेत गोरेगाव हायस्कूलचे माजी हेडमास्तर सुरेश पालकर व चंद्रकांत अधिकारी शाळेचे शिक्षक ,नेते रामदास जाधव, उपस्थित होते. जयंतीनिमित्त सर्वांना विकास गायकवाड यांचेकडून स्नेह भोजन दिले.

गोरेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या सवाद्य मिरवणुक काधण्यात आली मिरवणुकीचे स्वागत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सर्वपक्षीय व सर्व धर्मियानी स्वागत केले.

या प्रसंगी गोरेगावचे विजयराज खुळे, शिवसेना जिल्हा अध्यक्ष नंदू शिर्के, उद्योजक नरेश अहिरे, सुबोध बेंडखळी, अनिल गवसकर, सागर भोसले, मुकेश कडू, मंगेश कदम, रोहित शिंदे, प्रकाश हरवंडकर यांचे आंबेडकर चौकात स्वागत केले.

# आंबा, काजूची ई-पीक पाहणी वेळेत करा

**पेण ; प्रतिनिधी**

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेसाठी (आंबा व काजू) अर्ज केलेल्या सर्व शेतकऱ्यांसाठी 'ई-पिक पाहणी' करणे अनिवार्य करण्यात आले आहे.ज्या शेतकऱ्यांनी आंबिया बहार २०२४-२५ मध्ये फळपीक विमा योजनेत सहभाग घेतलेला आहे परंतु फळपिकांची ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे मोबाइल अ‍ॅपद्वारे केलेली नाही, त्यांनी २५ एप्रिलपर्यंत ई-पीकपाहणी पूर्ण करावी. ही प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय विमा दावा मान्य केला जाणार नाही, अशी माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

शेतकरी स्वतःच्या मोबाईलवरून ई-पिक पाहणी अँपद्वारे आपल्या शेतातील पिकांची माहिती व फोटो अपलोड करतात. ही प्रक्रिया केवळ काही मिनिटांची असून, भविष्यातील लाभासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ई-पिक पाहणी न केल्यास फळपीक विमा दावा स्वीकारला जाणार नाही. कोणीही

विमा लाभापासून वंचित राहू नये यासाठी शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. पेण तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन पेण तालुका कृषी अधिकारी सागर वाडकर यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

# सुधाकर घारे फाउंडेशनतर्फे आदिवासी वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा

**कर्जत : प्रतिनिधी**

सुधाकर घारे फाउंडेशनच्या वतीने दोन धोत्रे आदिवासी वाड्या, मेंगाळ वाडी, पेटार वाडी आणि नागे वाडी अशा पाच आदिवासी वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा शनिवार (दि. १९)पासून करण्यात येणार आहे. आज झालेल्या जनता दरबारात या आदिवासी वाड्यांमधील ग्रामस्थ येऊन त्यांनी आपली पाण्याची व्यथा मांडली होती.



रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी विधानसभा निवडणुक झाल्यानंतर पराभवाने खचून न जाता विविध उपक्रम सुरुच ठेवले आहेत. तसेच प्रत्येक शुक्रवारी नव्याने जनता दरबार सुरु केला आहे. या जनता दरबारात तालुक्यातील लोक आपल्या समस्या मांडतात आणि त्याची अंमलबजावणी लगेचच करण्यात येते. आज दोन धोत्रे आदिवासी वाड्या, मेंगाळ वाडी, पेटार वाडी आणि नागे वाडी येथील आदिवासी ग्रामस्थ माजी उपसभापती जयवंती हिदोळा यांच्या बरोबर जनता दरबारात आले होते. यामध्ये महिलांची संख्या जास्त होती. आमच्या वाड्यामध्ये पाण्याची समस्या आहे. त्यामुळे पाण्यासाठी वणवण करावी लागते. अशी व्यथा मांडली.

याप्रसंगी माजी उपसभापती जयवंती हिदोळा, ग्रामपंचायत माजी सदस्या गोमीबाई उघडा, अर्जुन केवारी, रामदास पादीर, अनंता थोराड, कमलाकर रसाळ, माजी सरपंच जयेद्र देशमुख, प्रमोद पिंगळे, केतन बेलोसे, रवींद्र घारे, महेंद्र घारे आदी उपस्थित होते. पाणी टंचाई असणाऱ्या या वड्यांपैकी काही वाड्यांसाठी जलजीवन मिशनच्या वतीने पाणी योजना आहे. मात्र पाण्याचा उदभाव नसल्याने या योजनेला पाणी नाही, अशी व्यथा ग्रामस्थांनी मांडली.

**CHANGE OF PRACTICING ADDRESS**

Name = Dr Sandeepa L Patil
State* Reg No = GB- I -24241
Teacher's code = AYSV00659

I am currently practicing at Mandsaur Institute of Ayurvedic Education and Research,PO Mandsaur, Pin- 458001, Madhya Pradesh, since 19 April 2024.

**CHANGE OF PRACTICING ADDRESS**

Name Dr. Monarani Chaurasia
State* Reg No = I-20173-A1
Teacher's code = AYRB01475

I am currently practicing at Mandsaur Institute of Ayurvedic Education and Research,PO Mandsaur, Pin-458001, Madhya Pradesh,since 18 Feb 2025

# जोगेश्वरी माता, भैरवनाथ महाराजांची पालखी ६४ तासानंतर मंदिरात





**नागोठणे : रामप्रहर वृत्त**

नागोठणे शहाराची ग्रामदैवता श्री. जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराज यांची पालखी उत्सव रविवार १३ एप्रिल रोजी सकाळी १०.०० वा. जोगेश्वरी मंदिरातून निघून संपूर्ण शहरात तीन दिवस तीन रात्र असे साधारण ६४ तास अहोरात्र फिरून पालखीचे बुधवार १६ एप्रिल रोजी पहाटे ०२.०० वा.च्या दरम्यान भक्तांना दर्शन देऊन मंदिरात आगमन झाले.यावेळी खा. सुनील तटकरे,आ.रविशेठ पाटील,मा. आ.अनिकेत तटकरे,द.जिल्हा भाजपा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पालखीचे दर्शन घेतले.

नागोठणे शहराची ग्रामदैवता श्री. जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराजांची चैत्र पौर्णिमेच्या दुसर्या दिवशी साजरा होणारा पालखी सोहळा साजरा करण्यात येतो. पालखी सोहळ्याच्या आदल्या दिवशी शनिवारी मंदिरात सत्यनारायणाची महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. या पालखी सोहळ्यानिमित्त दरवर्षी प्रमाणे या वर्षीही ग्रामस्थ मंडळ, खडकआळी यांनी देवीची काठी सजवून मंदिरासमोर उभी केली. पालखी निमित्ताने जोगेश्वरी मंदिर,मरीआई मंदिर, गणपति मंदिर तसेच मंदिराच्या परिसरातील तीन तळी व सभोवताली असलेल्या झाडांवर आकर्षक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. ठरल्यानुसार पालखी रविवार १३ एप्रिल रोजी सकाळी १०.०० वा. देवीची विधिवत पुजा करून मार्गस्थ झाली.या सोहळ्यात सरपंच सुप्रिया संजय महाडिक, जोगेश्वरी ट्रस्टचे अध्यक्ष नरेंद्र जैन, विश्वस्त भाई टके,उत्सव कमिटीचे अध्यक्ष चंद्रकांत ताडकर,उपाध्यक्ष संतोष चितळकर,सचिव विवेक देशपांडे,

माजी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, उपसरपंच अखलाक पानसरे,ग्रा. पं.सदस्य- ज्ञानेश्वर साळुंखे,ड. प्रकाश कांबळे,सचिन ठोंबरे,संतोष नागोठणेकर,ग्रा.पं.सदस्या- सुप्रिया काकडे,अमृता महाडीक,भाविका गिजे,पूनम काळे,ग्रामविकास अधिकारी राकेश टेमघरे,माजी अध्यक्ष- हरिष काळे व विलास चौलकर यांच्यासह ट्रस्ट व उत्सव कमिटीचे सर्व पदाधिकारी-सदस्य,ग्रामस्थ व भाविकांच्या उपस्थितीत देवीचे मुखवटे सजवलेल्या पालखीत विराजमान करण्यात आले. त्यानंतर फटाक्यांच्या आताषबाजी, ढोल ताशांच्या गजरात,'श्री. जोगेश्वरी माते की जय,भैरवनाथ महाराज की जय'',हर हर महादेवच्या जयघोषात, गोंधळी, वारकरी भजन मंडळ तसेच हजारो भक्तगणांच्या साथीने पालखी शहरामध्ये भक्तांना दर्शन देण्यासाठी मार्गस्थ झाली.रात्रभर फिरणार्या पालखीसाठी उत्तम प्रकारे जनरेटर व लाईटची व्यवस्था करण्यात आली होती.

**TENDER NOTICE**

Sealed Tenders are invited from reputed Builders/ Developers having similar experience for the Redevelopment of **The Nest Co-Op. Housing Society Ltd.** Plot No. 19, Sector 1, Kalamboli, Navi Mumbai-410208

(Regd. No. RGD/PWL/HSG/TC/581/92-93. Dt. 23/01/1992)

| | |
|---|---|
| Plot Area | 1081.89 sqmt. |
| No. of Shop | O nos |
| No. of Flats | 12 nos |
| Tender Sale | From 19/04/2025 to 03/05/2025 |
| Tender cost | Rs. 10,000/- (Non refundable) |
| Tender Submission | Upto 18/05/2025 at 07:00 pm |

The Applicants interested for the above referred works may contact **The Nest Co-Op. Hsg. Society Ltd.** Plot No. 19, Sector 1, Kalamboli, Navi Mumbai. **Mobile No-+91 9324647707** on dates mentioned above during 10 am to 6 pm.

Dated 17/04/2025

**Sd/-**
**Chairman / Secretary**
**The Nest Co-Op. Housing Society Ltd.**
Plot No. 19, Sector 1,
Kalamboli, Navi Mumbai.

### नवी मुंबईतील नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन

# मोरबे धरणाचा जलसाठा निम्म्यावर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वत:च्या मालकीचे धरण असलेल्या व जलसंपन्न शहर संबोधल्या जाणाऱ्या नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणातील जलसाठाही यंदाच्या उन्हाळ्यात प्रथमच ५० टक्क्यांच्या खाली आला आहे. सध्या धरणात ४९.३७ टक्के पाणी आहे. मात्र इतर शहरांच्या तुलनेत नवी मुंबईची स्थिती चांगली असून या साठ्यातून आणखी १३३ दिवस शहराला सुरळीत पाणीपुरवठा होऊ शकतो.

मुंबई व राज्यातील विविध भागांना जुलै महिन्यापर्यंत पाणीपुरवठ्याचे आव्हान पेलावे लागणार असताना नवी मुंबईत मात्र मोरबे धरणात सध्या मागील दोन वर्षांपेक्षा अधिक जलसाठा शिल्लक आहे. परंतु तरीही नागरीकांनी पाण्याचा वापर जपूनच करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

मागील वर्षी पावसाळ्यात चांगला पाऊस झाला होता. मोरबे धरण २८ ऑगस्ट २०२४ ला १०० टक्के भरले होते. त्यामुळे नवी मुंबईकरांची जलचिंता मिटली होती. धरणातून पाण्याचा विसर्गही करण्यात आला होता. परंतु वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवन तसेच पाणी मागणीही वाढू लागली आहे. धरणातून दिवसाला ४५० दशलक्षलीटर पेक्षा अधिक पाणी उपसा केले जात असून त्यावर नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे.



> **पाणी उपशाबाबत योग्य काळजी घेण्यात येत आहे. वाढत्या उष्णतेमुळे पाण्याची मागणी वाढत आहे. तसेच बाष्पीभवनही वाढत आहे. धरणातील जलसाठा ५० टक्क्यापेक्षा खाली आला असला तरी पाणीपुरवठ्याबाबत योग्य खबरदारी घेतली जात आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत अद्याप अधिक पाणीसाठा शिल्लक आहे. मात्र नागरिकांनी पाणी वाया घालवू नये.**
>
> **–अरविंद शिंदे**, अतिरिक्त शहर अभियंता, नवी मुंबई महापालिका

| | २०२३-२४ | २०२४-२५ |
|---|---|---|
| धरणात पडलेला एकूण पाऊस | ३७७०.४० मिमी. | ४२८० मिमी. |
| धरण पातळी | ७४.८३ मीटर | ७६.६५ मीटर |
| धरणातील जलसाठा | ८०.९६१ द.घ.मी | ९४.२४३ द.घ.मी |
| धरणात किती टक्के पाणीसाठा | ४२.४१ टक्के | ४९.३७ टक्के |

## नवी मुंबईतील पाम बीचच्या सर्व्हिस रोडला उच्च न्यायलयाची परवनगी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

जनहिताचा प्रकल्प असल्याने उच्च न्यायालयाने गुरूवारी नवी मुंबईतील क्विन्स नेकलेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाम बीच मार्गालगत सर्व्हिस रोडच्या बांधकामाला आक्षेप घेणारी याचिका फेटाळून लावून या रस्त्याला हिरवा कंदील दाखवला. पाम बीचलगत चाणक्य सिग्नल ते नेरुळ प्लॉट ७ दरम्यान हा सर्व्हिस रोड बांधण्यात येणार आहे.



सागरी किनारा क्षेत्रात (सीआरझेड) या सर्व्हिस रोडच्या बांधकामाला परवानगी देण्याच्या मागणीसाठी नवी मुंबई महानगरपालिकेनेही याचिका केली होती. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने हा जनहिताचा प्रकल्प असल्याचे नमूद करून महानगरपालिकेला हा प्रकल्प राबवण्यास परवानगी दिली. सीआरझेड क्षेत्रात विकासकामे करायची असल्यास त्यासाठी उच्च न्यायालयाची परवानगी घेणे अनिवार्य आहे. त्याच पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेने वकील तेजस दंडे यांच्यामार्फत ही याचिका केली होती.

तथापि, उच्च न्यायालयाची परवानगी अनिवार्य असतानाही ती न घेताच महानगरपालिकेने या सर्व्हिस रोडचे काम सुरू केल्याचा दावा करून स्थानिक रहिवासी दीपक सहगल यांनी या प्रकरणी अवमान याचिका केली होती. तसेच, या सर्व्हिस रोडला आक्षेप घेतला होता. या दोन्ही याचिकांवर गेल्या आठवड्यात अंतिम युक्तिवाद ऐकल्यानंतर मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने प्रकरणाचा निर्णय राखून ठेवला होता. न्यायालयाने गुरूवारी या प्रकरणी निर्णय देताना महापालिकेची याचिका मान्य केली, तर सेहगल यांची अवमान याचिका फेटाळली.

हा प्रकल्प व्यापक जनहितासाठी आहे आणि प्रकल्पासाठी खारफुटी तोडली जाणार नाही. त्याचप्रमाणे, या प्रकल्पाला एमसीझेडएमएने परवानगी दिली आहे. शिवाय, वन अधिकाऱ्याने प्रकल्पाची जागा पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात येत नाही. तसेच, प्रकल्पाची जागा कोणत्याही अधिसूचित राखीव वनक्षेत्रात येत नाही. खारफुटी संवर्धन केंद्राने देखील प्रस्तावित जागा अधिसूचित खारफुटी क्षेत्रात नसून खारफुटी क्षेत्रापासून २५ मीटर बफर क्षेत्रात येते, असे म्हटल्याचे न्यायालयाने प्रकल्पाला परवानगी देताना नमूद केली.

पर्यावरणाचे नुकसान करून विकासकाच्या फायद्यासाठीच या सर्व्हिस रोडचा घाट घातला जात आहे, असा दावा अवमान याचिकेद्वारे करण्यात आला होता. तसेच, परवानगीविना काम सुरू केल्याचा दावा करताना त्याबाबतची छायाचित्रेही याचिकेसह न्यायालयात सादर केली होती. शिवाय, नवी मुंबई हे नियोजित शहर आहे. त्यामुळे. तिथे सध्या वाहतूक कोंडीची समस्या नाही. परिणामी, सर्व्हिस रोडची आवश्यकता नसल्याचा दावाही अवमान याचिकाकर्त्यातर्फे करण्यात आला होता. या प्रकल्पाच्या आड येणारे कांदळवन तोडण्यात येणार असून त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होणार आहे. त्याचप्रमाणे, न्यायालयाने झाडे न तोडण्यासंदर्भात दिलेल्या आदेशाचेही महापालिकेने प्रकल्प राबवताना उल्लंघन केल्याचा दावा सहगल यांच्यावतीने वकील सुभाष झा यांनी युक्तिवादाच्या वेळी केला होता.

महापालिकेने दावा केला होता की, हा प्रकल्प जनहिताचा आहे. या सर्व्हिस रोडमुळे पाम बीच मार्गावरील वाहतूक आणखी सुरळीत होण्यास मदत होणार आहे, असे वरिष्ठ वकील मिलिंद साठ्ये यांनी महापालिकेच्या वतीने युक्तिवाद करताना न्यायालयाला सांगितले. त्याचप्रमाणे, या प्रकल्पासाठी महाराष्ट्र किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (एमसीझेडएमए) व पर्यावरणाच्या विविध परवानग्या घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे, कायद्याचे कोणतेही उल्लंघन केलेले नाही. तसेच, उच्च न्यायालयाच्या परवानगीसाठी ही याचिका केल्याचेही महानगरपालिकेच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. प्रकल्पाला आक्षेप घेणाऱ्या सहगल यांनी ऐकीव माहितीच्या आधारे अवमान याचिका केली, असा दावा देखील महानगरपालिकेने केला होता.

## पालिकेकडून होणाऱ्या १० हजार घरांच्या तोडक कारवाईला माथाडींचा विरोध

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील घणसोली, कोपरखैरणे, वाशी, नेरुळ येथे अल्प उत्पन्न गटातील माथाडी कामगारांनी गरजेपोटी बांधलेल्या बांधकामांना महापालिकेकडून सध्या तोडक कारवाई करण्याच्या संदर्भात नोटीसी देण्यात येत आहेत. सुमारे १० हजार माथाडी कामगारांना नोटीस बजावल्याने प्रचंड असंतोष आणि भीतीचे वातावरण पसरले आहे. कष्टकर्यांची घरे वाचवण्यासाठी माथाडीच्या नेत्यांनी बैठका घेत आपला विरोध दर्शविला आहे. माथाडींच्या घरांसाठी जनआंदोलनातून लढा उभारण्याचा इशारा दिला आहे.

नवी मुंबईत २०१५ नंतर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे उभी आहेत. याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने ४ महिन्यात शहरातील बेकायदा बांधकामांचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ह. कोपरखैरणे सेक्टर १ ते ८ तसेच १५ ते १८ मधील माथाडी वसाहतीत राहणार्या रहिवाशांना सिडको आणि महापालिकेने न्यायालयाच्या निर्देशानुसार घरे तोडण्याची नोटीस बजावली आहे. घर बचावासाठी 'अल्प उत्पन्न गट समन्वय समिती' च्या माध्यमातून बैठकांचे सत्र सुरू झाले आहे. या कारवाईला विरोध दर्शवण्यासाठी कोपरखैरणे सेक्टर ५ येथील स्व.अण्णासाहेब पाटील सभागृहात बैठक झाली. या बैठकीला माथाडींचे नेते माजी आमदार नरेंद्र पाटील व आमदार शशिकांत शिंदे उपस्थित होते.




माथाडींचे नेते नरेंद्र पाटील यांनी वाढीव घरे बनवत असताना पालिकेचे अधिकारी बांधकाम विकासक हे पैसे घेऊन गप्प का बसले? असा गंभीर आरोप केला आहे. अल्प उत्पन्न गटातील नागरिकांच्या घरांवर कुणाचा डोळा आहे? आमची लढाई कोर्टाच्या विरोधात नसून प्रशासनाच्या विरोधात आहे. ज्याप्रमाणे प्रकल्पग्रस्त आणि गाव गावठाणातील घरांसाठी लढा उभारला जाऊ शकतो त्याप्रमाणे माथाडीच्या घरांसाठी आगामी कालावधीत लढा उभारू, असे आश्वासन माथाडीचे नेते नरेंद्र पाटील यांनी दिले.

महापालिकेने माथाडी कामगारांच्या घरांवरील तोडक कारवाई त्वरित थांबवावी, यासाठी यापूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन देत सिडको प्रशासन, नवी मुंबई महानगरपालिका यांची संयुक्त बैठक आयोजित करून या विषयात तोडगा काढावा यासाठी मागणी पाटील यांनी केली आहे.

## देवळोली थांब्याजवळ अपघातांत वाढ

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राला जोडणारा कोन सावळा रस्त्याचे कॉंक्रीटीकरण झाल्याने या रस्त्यावरुन वाहने भरधाव चालवली जातात.याच रस्त्यावर कसळखंड, नारपोली, देवळोली, सावळा आदी गावे येत असल्याने ग्रामस्थांना रस्ता ओलांडताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

या रस्त्यावरुन औद्योगिक क्षेत्राकडे ये जा करणारी अवजड वाहने,कंपन्यांच्या बस,इतर वाहने भरधाव चालवली जात असल्याने अपघात होत आहेत.

## अनंत माळी यांना जीवन गौरव पुरस्कार



**उरण : वार्ताहर**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मधुबन कट्ट्यावर गुरुवार (दि. १७) एप्रिल रोजी अरविंद घरत यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला.

कोमसाप उरण शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, कार्याध्यक्ष रंजना केणी,अजय शिवकर, संजीव पाटील,संपदा पाटील,भरत मढवी,न.ग.पाटील, भालचंद्र म्हात्रे,अनुप शिवकर, अनामिका राम,सपना शर्मा, मारुती तांबे इत्यादी कवींनी जागराच्या चिड निर्माण करणा–या कविता सादर केल्या

यावेळी समाजातील समाज सेवक उत्कर्षचे गोपाळ पाटील, , लोकपरंपरा नृत्य संस्थेचे मालक दत्ता भोईर, उरण –पनवेलचे सुप्रसिद्ध उद्योजक अनंत नाथा माळी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेआणि गायक प्रकाश तांडेल,न.ग.पाटील यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

पनवेल तालुक्यातील केळवणे राहणारे अनंत नाथा माळी हे उरण –पनवेल येथील उद्योजक असून ते इंजिनीअर आहेत .समाज सेवक असून समाजातील गरीब लोकांना मदतीचा हात ते नेहनीच देत असतात .त्यांना मान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले .त्यांना सन्मान चिन्ह ,शाल ,पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले .

यावेळी चंद्रकांत मुकादम,संजय कैणी. दत्ताराम नीळवर्ण ,पत्रकार दिनेश पवार ,काशिनाथ झांबरे,कवी ,रवींद्र माळी,अमित पाटील, निलेश म्हात्रे, ग्रामस्त आदी ,मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय होळकर यांनी केले.

## शेतकरी वर्गांनी फळझाडांचा ई पीक विमा उतरावा –तालुका कृषी अधिकारी

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

आंबा व काजु हे फळपिक निसर्गावर अवलंबून असल्यामुळे निसर्गाच्या लहरीपणामुळे हे पिक धोक्यात येत चालले आहे.यामुळे शेतकरी वर्गांस मोठा नुकसान सहन करावे लागते.मात्र पीक पाहणी योजने अंतर्गत सहभाग नोंदविलेल्या शेतकऱ्यांना पीक संरक्षित रक्कम मिळत असते. ज्या शेतकऱ्यांनी आंबिया बहार सन २०२४–२५ मध्ये फळपिक विमा योजनेत सहभाग घेतलेला आहे. अशा शेतकऱ्यांनी फळपिक पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्व्हे मोबाईल ॲपद्वारे २५ एप्रिल पर्यंत पूर्ण करुन घ्यावी. असे आवाहन , खालापूर तालुका कृषी अधिकारी सुनिल निंबाळकर यांनी केले आहे



सदर योजना १२ जून २०२४ रोजी शासन निर्णयामध्ये महाराष्ट्र राज्यात राबविण्यात येत आहे. रायगड जिल्हामध्ये आंबिया बहार सन २०२४–२५ क एकरिता युनिवर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी मार्फत आंबा व काजु या फळपिकांसाठी ही योजना राबविण्यात येत आहे.यामुळे शेतकऱ्यांना ई– पीक पाहणी करणे बंधनकारक असणार आहे.

सदर विमा संरक्षित क्षेत्राची ई–पीक पाहणी २५ एप्रिल पर्यंत पूर्ण करुन घ्यावी अन्यथा योजनेच्या निकषानुसार ई –पीक पाहणी नोंद नसलेले सर्व विमा अर्ज कंपनीमार्फत रद्द करण्यात येतील,व फळपिक विमाचा लाभ मिळणार नाही. अशी माहिती खालापूर तालुका कृषी अधिकारी, सुनिल निंबाळकर यांनी दिली तसेच त्यांनी सर्व विमाधारक शेतकऱ्यांना ई–पीक पाहणी करण्याबाबत आवाहन केले आहे.

## मोहोपाडा एचओसी वसाहतीत हनुमान जयंती

**मोहोपाडा: प्रतिनिधी**

मोहोपाडा एचओसी कॉलनी येथील हनुमान मंदिरात श्री हनुमान जयंती उत्सव( वर्ष तिसरे) अत्यंत उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली. सकाळी अभिषेक व हनुमान स्रोताचे पठण करून उत्सवास सुरुवात करण्यात आली



सायंकाळी एचओसी मोहोपाडा गेट समोरील मंडपात अभिषेक व हनुमान चालीसा पठण करण्यात आले. सायंकाळी मंदिरातील आरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदर उत्सवाच्या ठिकाणी अनेक भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी सर्व हनुमान भक्तांच्या माध्यमातून मंदिरासाठी रस्ता खुला करण्यात आला.

श्री हनुमान मंदिर व आसपासचा परिसर सजवीण्यात आला होता. महाराष्ट्र नवनिर्माण सेना खालापूर तालुका उपाध्यक्ष विनोद शिंदे यांच्यामार्फत सुशोभीकरण करण्यात आले. सदर उत्सवाचे नियोजन करणेसाठी अभिजित घरत,संदीप साळुंके ,निर्मल शर्मा, जगदीश पवार, शेखर सवार, भाई टिळेकर, मयूर गायकवाड, सचिन माळी, गिरीश जोरी, रुपेश लबडे, विशाल यादव व इतर यांनी मेहनत घेतली.

## दुर्बीणीद्वारे केली खांद्यांवर शस्त्रक्रिया

**नवी मुंबई : बातमीदार**

वर्षानुवर्षे खांद्याच्या वेदना सहन केल्यानंतर अखेर ६५ वर्षीय महिलेला तिचे स्वातंत्र्य परत मिळाले. स्वतः चे केस विंचरणे किंवा एखादी वस्तू उचलणे यासारखी सोपी कामंही तिच्याकरिता आव्हानात्मक ठरत होती. सततच्या वेदना आणि मर्यादित हालचालींमुळे त्रस्त असलेल्या या रुग्णावर खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दुर्बीणीद्वार शोल्डर रिकन्स्ट्रक्टिव्ह शस्त्रक्रिया करण्यात आली. या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर ती आता सामान्य आयुष्य जगत असून तिला दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून रहावे लागत नाही.

नवी मुंबईत राहणाऱ्या रुग्ण सुरेश देवी (६५वर्षे) या रुग्णाला गेल्या काही वर्षांपासून खांद्याचे दुखणे सहन करावे लागत होते, ज्याचा दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होऊ लागला. सततच्या अस्वस्थतेमुळे अगदी सोप्या कामांनाही तिला अनेक आव्हानांचा सामना करावा लागत असे. तिला आरामदायी स्थिती न मिळाल्याने रात्रीच्या वेळी शांत झोप लागत नव्हती. बऱ्याचदा तिला वेदनेमुळे झोपमोड व्हायची. सततच्या वेदनेमुळे तिला तिचा हात हलवण्यासही भिती वाटू लागली होती. कारण थोडीशी जरी हालचाल झाली तरी वेदनांमध्ये वाढ होत असून अस्वस्थ वाटायचे. दैनंदिन कामांसाठी तिला इतरांवर अवलंबून रहावे लागत होते. तिने यापूर्वी अनेक ऑर्थोपेडिक डॉक्टरांना भेट दिली होती परंतु तिला हवा तसा आराम मिळाला नाही.

मेडिकव्हर हॉस्पिटलला भेट दिल्यानंतर, तिला क्रॉनिक रोटेटर कफ टीअरचे निदान झाले, ज्यामुळे तिच्या खांद्याच्या कार्यावर गंभीर परिणाम झाला होता. त्यावर करण्यात आलेल्या यशस्वी शस्त्रक्रियेने तिला केवळ आरामच मिळाला नाही तर नव्याने आयुष्याची सुरुवात करण्याची संधी मिळाली. सततच्या वेदनांनी मी माझ्या खांद्याची हलचाल पुर्ववत होण्याची आशा जवळजवळ गमावलीच होती अशी प्रतिक्रिया रुग्णाने व्यक्त केली.

## मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर एनएमएमटी बस मार्गाचे सुधारित वेळापत्रक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत नेरूळ सेक्टर ४६–४८, नेरूळ बस स्थानक, सीबीडी, घणसोली – घरोंदा, पनवेल रेल्वे स्थानक, खारघर सेक्टर ३५, खारकोपर रेल्वे स्थानक या ठिकाणहून मंत्रालय (वर्ल्ड ट्रेड सेंटर) करिता वातानुकूलित बस सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मार्गावरील दैनंदिन बस संचलन सुरळीत राहणेकरिता कार्यान्वित असलेला कोणताही मार्ग बंद न करता मार्ग क्र.१०६, मार्ग क्र.१०८, मार्ग क्र.११० व मार्ग क्र.११४ या मार्गाचे सुधारीत वेळापत्रक तयार करण्यात आले आहे.त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. मार्ग क्र. १०६ – पनवेल रेल्वे स्थानक ते मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर पनवेल रेल्वे स्थानक – रद्द केलेली फेरी : ७.२० – सुरु असलेली फेरी : ७.५० मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर – रद्द केलेली फेरी : १६.५० – सुरु असलेली फेरी : १८.२०



२. मार्ग क्र. १०८ – नेरूळ सेक्टर ४६/४८ ते मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर नेरूळ सेक्टर ४६/४८ – रद्द केलेली फेरी : ७.५० – सुरु असलेली फेरी : ८.१५ मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर – रद्द केलेली फेरी : १७.१५ – सुरु असलेली फेरी : १८.३०

३. मार्ग क्र. ११० – खारघर सेक्टर ३५ ते मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर खारघर सेक्टर ३५ – रद्द केलेली फेरी : ७.१० – सुरु असलेली फेरी : ७.३० मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर – रद्द केलेली फेरी : १७.५० – सुरु असलेली फेरी : १८.४०

४. मार्ग क्र. ११४ – घणसोली घरोंदा ते मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर घणसोली घरोंदा – रद्द केलेली फेरी : ७.४० – सुरु असलेली फेरी : ७.५५, ८.१० मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर – रद्द केलेली फेरी : १७.०५ – सुरु असलेली फेरी : १७.३५, १८.०५तसेच मार्ग क्र.१०७ – सिबीडी – मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर, मार्ग क्र.११५ – खारकोपर रेल्वे स्थानक – मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर, मार्ग क्र.११६ – तुर्भे/नेरूळ – मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर मार्गे 'अटल सेतू' व मार्ग क्र.११७ – खारघर/ पनवेल – मंत्रालय वर्ल्ड ट्रेड सेंटर मार्गे 'अटल सेतू' या मार्गावरील कार्यान्वित वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात आला नाही.

सदर मार्गावर नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी उपरोक्त सुधारीत वेळापत्रकाची नोंद घेवून सहकार्य करण्याबाबत परिवहन प्रशासनाने विनंती केली आहे.



## पनवेल वकील संघटने तर्फे नवनियुक्त न्यायाधीशांचा सत्कार

**पनवेल: वार्ताहर**

पनवेल वकील संघटनेचे सदस्य असलेले नवनियुक्त न्यायाधीश वंदना अरविंद चामले व ऋषिकेश सुनील पाटील यांचा पनवेल वकील संघटनेतर्फे पनवेल न्यायालय येथील वकील रूम येथे सत्कार आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमास पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, सचिव प्रल्हाद खोपकर, निवृत्त न्यायाधीश हवेलीकर, ज्येष्ठ वकील सुरेश खानावकर, ज्येष्ठ वकील जगदीश उरणकर, अधिवक्ता परिषद, रायगड जिल्ह्याचे महामंत्री ज्येष्ठ वकील सुनील तेलगे, ॲड.अरविंद चामले हे प्रामुख्याने हजर होते.

सदर प्रसंगी नवनियुक्त न्यायाधीश वंदना चामले यांचा सत्कार निवृत्त न्यायाधीश हवेलीकर यांनी केला. तसेच नवनियुक्त न्यायाधीश ऋषिकेश पाटील त्यांचा सत्कार ज्येष्ठ वकील सुरेश खानावकर यांच्या हस्ते झाला.

याप्रसंगी पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी नवनियुक्त न्यायाधीश वंदना चामले व ऋषिकेश पाटील यांचे पनवेल वकील संघटनेतर्फे अभिनंदन व्यक्त करून पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. ॲड. सुरेश खानावकर, ॲड. अरविंद चामले, ॲड.जगदीश उरणकर यांनी देखील आपले विचार मांडले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वकील सुनील तेलगे यांनी केले.

# खोपोलीचे नाट्यगृह नवी झळाळी घेणार

## डागडुजी व दुरूस्तीची कामे प्रगतिपथावर

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील सांस्कृतिक वारसा असलेले व बारा वर्षांपूर्वी लोकार्पण झालेले छत्रपती शाहू महाराज सामाजिक सभागृह नाट्यगृहाची पुढील पाच-सहा वर्षातच बिकट स्थिती बनली होती. पुढे कोरोना काळ व त्यानंतरच्या मागील तीन वर्षे या संकुलाची अवस्था दयनीय झाली. हे नाट्यगृह संकुल पुनर्जीवित होण्यासाठी खोपोलीतील सामाजिक, कला व नाट्य क्षेत्रातील मंडळी एकत्रित येऊन सर्वांनी नगरपालिका प्रशासन, आमदार महेंद्र थोरवे व मंत्री अदिती तटकरे यांच्याकडे सतत पाठपुरावा केला.

याची दखल घेत आमदार थोरवे यांनी छत्रपती शाहू महाराज नाट्यगृह संकुल डागडुजी व अन्य कामासाठी पहिल्या टप्प्यात ५० लाखाहून अधिक निधी उपलब्ध करून दिला व कामाला सुरुवात झाली आहे.




मागील सात-आठ महिने नाट्यगृह संकुल डागडुजी व अन्य कामे सुरू आहेत, मात्र कामाची गती अतिशय मंद असल्याने वर्तमान स्थितीतही मोठ्या प्रमाणावर कामे होण्याचे शिल्लक आहे. दरम्यान, नगरपालिका प्रशासनाने पावसाळ्यापूवी ही कामे पूर्णत्वाला येतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

सुशोभीकरण, छत, आसन व्यवस्था, इंटेरिअर व विद्युत रोषणाई, एसी, साउंड सिस्टीम व डागडुजीची कामे पूर्णत्वास येणार आहेत. वर्तमान स्थितीत बाहेरची कामे सुरू असून अंतर्गत कामे अद्यापही सुरू झालेली नाहीत. सर्व कामे पूर्णत्वास येण्यास साधारण चार-पाच महिने कालावधी लागणार असल्याचे समजते.

बहुचर्चित शाहू महाराज नाट्यगृह व सामाजिक सभागृह लवकरात लवकर सुस्थितीत येऊन पुन्हा सुरू होणार असल्याने शहरातील नाट्यकर्मी, नाट्यप्रयोग आयोजन करणारी मंडळी व सर्वसामान्य नागरिकांत समाधान व्यक्त होत आहे. दरम्यान, ही कामे वेळेत व कालमर्यादेत पूर्ण व्हावीत, अशी अपेक्षा आहे.

> **संबंधित ठेकेदाराला मान्सून हंगाम सुरू होण्यापूर्वी बाहेरील सर्व कामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अंतर्गत कामांसाठी दोन तीन महिने कालावधी लागणार असून कालमर्यादेत व तांत्रिक अतिशर्ती नुसार ही कामे पूर्ण होण्यासाठी खास अभियंता नियुक्त करण्यात आला आहे.**
> **-डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी, खोपोली**

# माणगावमध्ये ५० कोटींच्या सुधारित नळ पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू

**माणगाव : प्रतिनिधी**

झपाट्याने विकसित होणारे तालुक्याचे मुख्यालय असलल्या माणगाव शहरात सुमारे ५० कोटी खर्चाची सुधारित नळ पाणी पुरवठा योजनेचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे मुबलक व पुरेशा पाण्याच्या प्रतीक्षेत असणाऱ्या माणगावकरांची या योजनेमुळे पाण्याची प्रतीक्षा संपणार आहे.

सुमारे ५० हजार नागरिकांना दर माणसी, दर दिवशी १३५ लीटर पाणी देण्याची योजना माणगाव नगरपंचायतीने आखली आहे. २६ ऑगस्ट २०२४पासून या योजनेचे काम सुरू झाले. मंत्री व स्थानिक आमदार भरत गोगावले यांच्या प्रयत्नामुळे ४० वर्षानंतर ही सुधारित पाणीपुरवठा योजना हायडेनसिटी कॉलेटी पाईपद्वारे करण्यात येणार आहे.

सध्या रेल्वेपुलाकडच्या पूर्वेला असलेल्या भागात जुन्या नळ योजनेतून पाणी मिळणार आहे. पश्चिमेकडील गावातील भागासाठी खांदाडजवळ नदीच्या संगमाच्या अलीकडे नवीन जॅकवेल बांधून सात लाख लिटरची पाणी साठवण्याची टाकी व स्वतंत्र फिल्ट्रेशन टाकी बांधण्यात येणार आहे. हे काम सध्या ३० टक्के झाले आहे. नागरिकांना पुरेसे स्वच्छ व शुद्ध पाणी मिळण्यासाठी ही पाणीपुरवठा योजना दोन विभागात करण्यात आली आहे. पूर्वीच्या टाकीची दुरुस्ती करण्यात येऊन सुमारे दोन लाख ७५ हजार लिटर, दोन लाख २५ हजार लिटर व एक लाख लिटरच्या विविध ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या टाक्या बांधण्याचे काम सुरू झाले आहे.

भादावमध्ये एक लाख लिटर, जुन्या माणगावमध्ये एक लाख ८० हजार लिटर, नानोरे पूर्व एक लाख लिटर व पश्चिमेस दोन लाख ७५ हजार लिटर, दत्त नगरमध्ये दोन लाख लिटर अशा विविध ठिकाणी टाक्या बांधण्यात येणार असल्याची माहिती इंजिनियर आकाश बुवा यांनी दिली. बाजारपेठेत २४ तास व इतर रहिवासी ठिकाणी सकाळी तीन तास व संध्याकाळी तीन तास पाणीपुरवठा करण्याची योजना आहे. पुण्याच्या एस.के. इंटर प्रायझेसमार्फत हे काम सुरू असून २६ फेब्रुवारी २०२६पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. यात केंद्र सरकार ५०%, राज्य सरकार ४५% व माणगाव नगरपंचायत ५% असा खर्चाचा भार उचलणार आहे.



माणगाव हे गोद व काळ नदीच्या काठावर वसले असून मुंबई-गोवा व दिघी पुणे या महत्त्वाच्या महामार्गावर आहे. अनेक शासकीय कार्यालये, बँका, महत्त्वाची शैक्षणिक संस्था व शासकीय निम शासकीय कार्यालये, व्यापार, उद्योग व औद्योगिकरणामुळे माणगावला येणारे सरकारी कर्मचारी किंवा इतर नागरिक माणगावच्या प्रेमात पडतात व इथेच स्थायिक होतात. ४० वर्षापूर्वीची भादावजवळ काळ नदीच्या डोहावर एकमेव जॅकवेल असलेली नळ पाणीपुरवठा योजना वाढीव भादाव, उत्तेखोल, नाणोरे, जुने माणगाव आदी भागाला नियमित पाणीपुरवठा करण्यास अपुरी पडते. त्यामुळे लोकांमध्ये असंतोष आहे. तो नव्या योजनेमुळे भविष्यात दूर होणार आहे.

> **भविष्यात माणगावला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्‌भवू नये म्हणून सुमारे ५० कोटी रुपये खर्चून सुधारित नळ पाणीपुरवठा करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या योजनेचे काम दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व पारदर्शक पद्धतीने ठेकेदाराकडून नगरपंचायतीने करून घ्यावे एवढीच लोकांची माफक अपेक्षा आहे.**
> **-डॉ. मोहन दोशी, सामाजिक कार्यकर्ते**

# पोसरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाचे भूमिपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पोसरी गावाच्या बौद्धवाडीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भवन उभारण्याच्या कामाचे भूमिपूजन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले. या भावनासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



कार्यक्रमास माजी उपसभापती मनोहर थोरवे, उद्योजक विश्वनाथ थोरवे, सरपंच एकनाथ भगत, माजी सरपंच हर्षद विचारे, सदस्य निलेश थोरवे, ग्रामसेवक धनंजय देशमुख, डॉ. राजू थोरवे आदी उपस्थित होते. या वेळी आमदार महेंद्र थोरवे यांनी, या भवनासाठी सुरुवातीला २५ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला असून भविष्यात सुशोभीकरण व इतर कामांसाठी आणखी २५ लाखांचा निधी देण्याचे आश्वासन दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे सर्वधर्मीय व समाजातील गोरगरीब, शोषित, वंचित घटकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी दिलेल्या संविधानामुळे भारत आज महासत्तेकडे वाटचाल करत आहे. प्रत्येक गावात बाबासाहेबांची जयंती साजरी व्हावी, हीच खरी आदरांजली ठरेल, असेही आमदार थोरवे म्हणाले.

कार्यक्रमास पंचशील तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष कुंडलिक रोकडे, अनिल रोकडे, मनोहर रोकडे, किसन रोकडे, अविनाश रोकडे, राजेश रोकडे, परशुराम जाधव, योगेश रोकडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# माणगाव येथील हनुमान मंदिराची उद्या यात्रा

**माणगाव : प्रतिनिधी**

जुने माणगावच्या संगमेश्वर नगरातील हनुमान मंदिराची यात्रा रविवारी (दि. २०) असून या यात्रेचा व तीर्थप्रसादाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन जत्रोत्सव कमिटी व गावचे माजी पोलीस पाटील सुभाष पारखे यांनी केले आहे.

यानिमित्ताने उतेखोल गावाच्या जंगलात बसलेली वाकडाई देवी एक वर्षाने जुने माणगावमध्ये येते आणि सर्व परिसरात फिरून भैरी भावाला भेट देते. त्या अगोदर भावाकडून वाकडाई देवीला मानाची ओटी, नारळ व साज दिला जातो. देवी गावात आली की ग्रामस्थ हिंदू, मुस्लिम बांधव-भगिनी श्रीफळ देऊन त्यांचे स्वागत करतात. दर्शनासाठी यात्रेच्या निमित्ताने मोठ्या संख्येने भाविक या मंदिरात येऊन दर्शन घेत असतात. आजपर्यंत देवीचा तोच मान आहे. या यात्रेत उतेखोल गावातून पालखी व काठी तसेच जुने माणगाव कुंभार आळी यांची काठी येत असते. अत्यंत उत्साहात ही यात्रा गावकऱ्यांच्या सहभागाने होत असते. या यात्रेची सध्या तयारी सुरू आहे.

# शेतकऱ्यांनी विमा संरक्षित ई-पीक पाहणी करून घ्यावी

## ■ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यामध्ये आंबिया बहार सन-२०२४-२५करिता युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत आंबा व काजू फळपिकांसाठी फळपीक विमा योजना योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी विमा संरक्षित क्षेत्राची ई-पीक पाहणी पूर्ण करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

१२ जून २०२४च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यात पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात येत आहे. पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेच्या निकषानुसार या विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना ई-पीक पाहणे करणे बंधनकारक आहे. ज्या शेतकऱ्यांनी आंबिया बहार सन २०२४-२५मध्ये फळपीक विमा योजनेत सहभाग घेतलेला आहे, परंतु फळपिकांची ई-पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्व्हे मोबाईल ॲपद्वारे केलेली नाही. त्यांनी २५ एप्रिलपर्यंत विमा संरक्षित क्षेत्राची ई-पीक पाहणी पूर्ण करुन घ्यावी; अन्यथा योजनेच्या निकषानुसार ई-पीक पाहणी नोंद नसलेले सर्व विमा अर्ज रद्द करण्यात येतील व फळपीक विम्याचा लाभा दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी, असे कळविले आहे.

## मंथन परीक्षेत कार्तिकचे सुयश

**माणगाव : बातमीदार**



माणगाव तालुक्यातील चांदोरे येथील दुसरी इयत्तेत गोरेगाव येथे शिक्षण घेत असलेला विद्यार्थी कार्तिक नंदकुमार चांदोरकर हा मंथन राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत उत्तम गुण मिळवून राज्यात विसावा, जिल्ह्यात पंधरावा तर केंद्रात तिसरा आला.

कार्तिक हा र.का. गांधी प्राथमिक विद्यामंदिर गोरेगाव येथे शिक्षण घेत असून कार्तिकला मोठेपणी आयपीएस बनण्याची इच्छा आहे. कार्तिकला पहिल्यापासूनच अभ्यासाची व अशा वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा देण्याची आवड असल्याचे कार्तिकचे वडील नंदकुमार चांदोरकर यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय मंथन, नवोदय परीक्षेत कोर्लई मराठी शाळेने मारली बाजी




**मुरूड : प्रतिनिधी**


राज्यस्तरीय मंथन आणि नवोदय या स्पर्धा परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले. शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागून राहिलेल्या अत्यंत चुरशीच्या तसेच महत्त्वाच्या परीक्षेत मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील मराठी शाळेतील विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व यश मिळवले. या स्पर्धा परीक्षांकडे भविष्यातील केंद्रीय आणि राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने पाहिले जाते.

या विविध स्पर्धा परीक्षांमध्ये निषाद रमाकांत ठाकूर, सारा शैलेश महालकर, विराध्या सनी सोडेकर, तीर्था सिद्धेश रोटकर, लावण्या देवेंद्र पाटील, आहिदा मुश्ताक कुदेकर, ध्रुवी प्रशांत पाटील या गुणवंत विद्यार्थ्यांनी यश मिळवले. विशेष बाब म्हणजे मंथन या राज्यस्तरीय परीक्षेत निषाद रमाकांत ठाकूर हा विद्यार्थी राज्यात सतराव्या, तर जिल्ह्यात नवव्या रँकने उत्तीर्ण झाला.

जिल्हास्तरीय रायगड टॅलेंट सर्च परीक्षांच्या निकालातही कोर्लई मराठी शाळेचे विद्यार्थी लेवल १चा टप्पा पार करून अव्वल ठरले. समाजातील विविध स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्याचप्रमाणे शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी कवळे यांच्यासह सहशिक्षक हेमंत भोईर, हर्षला ठाकूर, वैशाली पनासे यांचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, सरपंच राजश्री मिसाळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गजानन पाटील, सर्व सदस्य तसेच पालक, ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

# रेवदंड्यातील पोर्तुगीजकालीन आगरकोट किल्ला

चौल चंपावती या प्राचीन संपन्न नगरीचे पोर्तुगीज अमलामध्ये दोन भाग पडून रेवदंडा विभागाला लोअर चौल व चौल विभागाला अप्पर चौल संबोधले जाऊन रेवदंडा व चौल ही दोन ग्राम गावे निर्माण झाली. सन १५२४मध्ये पोर्तुगीजांनी रेवदंड्याचा आगरकोट किल्ला बांधून पूर्ण केला व सुमारे २०० वर्षापेक्षा जास्त काळ म्हणजेच मराठ्यांनी १७४०मध्ये हा प्रदेश ताब्यात घेईपर्यंत तो पोर्तुगीजांच्या ताब्यात होता. या कालावधीत या किल्ल्यात बांधलेल्या अनेक इमारती, बुरूज, तटबंदी चर्च, दरवाजे, तुरूंग, पागा, इत्यादींचे अनेक भग्नावशेष आजही पहावयास मिळतात.



रेवदंडा गावाच्या दक्षिण टोकास या किल्ल्याचा दक्षिण दरवाजा आहे. तेथपासून अलिबाग रस्त्यावर किल्ल्याचा तट फोडून तयार केलेल्या मार्गापर्यंत हा किल्ला विस्तारलेला आहे. रेवदंडा-अलिबाग रस्त्याच्या थोडे पुढे पश्चिमेला किल्ल्याचा उत्तर दरवाजा आहे. या दोन दरवाजामध्ये असणाऱ्या किल्ल्याचे अनेक अवशेष आजही इथे आहेत.

सोळाव्या शतकात १५२४मध्ये किल्ला बांधल्यानंतर या शतकाच्या अखेर पूर्व काळात येथे अनेक इमारती बांधल्या गेल्या. १६३४मध्ये बोकारो याने या ठिकाणचे खुलासेवार वर्णन केले आहे. त्या वेळी पोर्तुगीज किल्ल्यात घडीव दगडांच्या भिंती असलेल्या आवाराच्या आत सेनाधिकारी राहत होता. तेथे एक तुरूंगही होता. किल्ल्यात २०० पोर्तुगीज व ५० स्थानिक ख्रिश्चनांची मजला असलेली घरे होती तसेच दोन शस्त्रागरे होती. त्याचप्रमाणे भव्य कॅथेड्रक रुग्णालय, सेंट पॉल जेझुईट चर्च, जेझुइट मोनॅसटी, डोमिनिकन फ्रॉन्सिस्कन चर्च, सातखणी बुरूज यामध्ये सातखणी बुरूज डोमिनिकन फ्रॉन्सिस्कन चर्चचा भाग समजला जातो. ऑगास्टिनियन चर्च व मॉनेस्टटी अशा सात इमारती होत्या. पोर्तुगीज काळात या भागाचे वैभव खूप मोठे आवे, काळाच्या औघात या वास्तू नष्ट झाल्या. त्याप्रमाणे भिंतीच्या बाहेर सेंट सॅबेस्टीयन चर्च, सेंट जॉन पॅरिस चर्च व मदर ऑफ गॉडचे कॅपूचिन चर्च अशा तीन इमारती होत्या. त्यापैकी मदर ऑफ गॉडचे मंदिर, रेवदंडा गोळा स्टॉपवरून भोईवाडा येथे जाणाऱ्या रस्त्यावर अस्तित्वात आहे. त्याला मांजरूबाईचे मंदिर असेही म्हटले जाते. मांजरदेस असाही उल्लेख इतिहासात आढळतो.

बोकारोने आणखी काही वास्तू व बुरूजांची नोंद करून ठेवली आहे. त्यात नऊ बुरूजांचा तो उल्लेख करतो. नदीच्या बाजूकडे पहिल्या बुरूजावर १८ पौड वजनाची दगडी गोळे मारू शकणारी कॅमेस नावाची एक मोठी तोफ होती. दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाच्या बुरूजावर फक्त वाळू भरून ठेवली होती. चौथ्या बुरूजावर १८ पौढी दमडी गोळा फेकणारी आणखी एक कॅमेल तोफ व ६५ पौढी लोखंडी गोळा गोळा फेकणारी एक तोफ व प्रत्येक अशा दोन तोफा व लहानसे किल्ल्यासारखे बांधकामे होती व आतून लोखंडी आवरण असलेली पितळी सर्पाकृती तोफ होती. तिच्यातून १६ पौडी गोळे उडवत. सॅम डिनिस या सहाव्या बुरूजावरून लोखंडी तोफेतून १४ पौडी दगडी गोळे उडवित. येथे समुद्राकडे तोंड करून लहानशा किल्लासारखे बांधकाम होते. सातव्या बुरूजावर ४० पौड वजनाचे गोळे फेकणारी गरूड तोफ व प्रत्येक ५० पौड वजनाचे गोळे फेकणाऱ्या दोन तोफा होत्या. आठव्या बुरूजावर तोफा नव्हत्या. शेवटच्या नवव्या बुरूजावर २४ पौड वजनाची लोखंडी गोळे फेकणारी एक तोफ होती.

१६२५मध्ये आग्नेय कोपार बांधला तेव्हा कॅथेड्रल भिंतीच्या बाहेर होते, मात्र १६३४मध्ये ते भिंतीच्या आत आले. १६३४नंतर तटबंदीची बरीच दुरूस्ती केली. १६३५मध्ये उत्तर दरवाजा, तर १६३८मध्ये दक्षिण दरवाजा दुरूस्त झाला. १६५६मध्ये दक्षिण दरवाजासमोरचे बांधकाम केले. व १६८८मध्ये वायव्येचा टॉवर बांधला. सरासरी ६.०९ मीटर उंच व ३.६६ मीटर रूंद असलेल्या गोलाकार भिंतीची लांबी अंदाजे २.४२ किमी होती. या भिंतीवर बंदुकीने मारा करण्यासाठी लहान झरोके असलेली १.८३ मीटर उंचीची दुसरी भिंत होती तसेच अर्धवर्तुळाकार नऊ मनोरे होते.

५ डिसेंबर १७२८ रोजी आंद्रे रिबेरो कुटिन्होने पोर्तुगीज चौलची म्हणजे रेवदंड्याची कार्यालयीन तपासणी केल्यावर लिहिलेल्या अहवालानुसार किल्ला आकाराने पंधरा बाजू असलेला व अकरा बुरूजाचा होता. तीस ते चाळीस पौडी ५८ तोफा दगडाचा मारा करण्याचा तोफा, ६२ व्यक्तीची एक याप्रमाणे तीन कंपन्या होत्या. याशिवाय स्थानिक मच्छीमार बोटीवाले व नारळाच्या झाडावर चढणारे होते. कुटिन्हो याने असेही नमूद केले आहे की, १६३४पासून तटबंदीची इतकी दुरूस्ती झाली, ती जणू नव्याने बांधल्यासारखी आहे. पश्चिमेच्या बाजूने समुद्राच्या लाटांमुळे झालेले नुकसान सोडता बाकी बांधकाम सुस्थितीत आहे.

दक्षिण दरवाजाच्या दोन कमानीतून आत गेल्यावर थोडे पूवला चौकोनी बुरूज आहे. येथेच पोर्तुगीजांनी १५१६ सालात वखार बांधली व सभोवती सुरक्षिततेसाठी १५२१-११५२४ या कालावधीत मजबूत भिंती बांधल्या. पोर्तुगीजांची ही गोव्याबाहेरील ही सर्वात जुनी इमारत आहे. वखारीचा दर्शनी भाग दगडी दरवाजाची एक सुंदर कमान असून ती शाबूत आहे. तिच्या वरच्या बाजूस मध्यभागी पोर्तुगीज बोधचिन्ह असून त्याच्या दोन्ही बाजूस उभ्या मानवाकृती आहेत. वरच्या बाजूस क्रॉस व थोडे कोरीव काम आहे.

वायव्येस बुरूजाजवळील लहान दरवाजाच्या आग्नेयेस ४५.७२ मीटरवर तटबंदीच्या पश्चिमेकडील भिंतीत पडलेल्या भगदाडासमोर १५३४च्या सुमारास बांधलेल्या फ्रान्सिस्कन इमारतीच्या मध्यभागी असलेल्या ६.०९ मीटर चौकोनी आकाराच्या सातखणी बुरूजाच्या भिंतीचा सांगाडा अजूनही उभा आहे. पूर्वी त्यांची उंची २९.२६ मीटर इतकी नमूद केलेली असली तरी वरच्या बाजूने भिंती पडल्याने उंची कमी झालेली आहे. बुरूजाच्या लगत भोवताली सर्व इमारती पुर्णपणे पडलेल्या असून कुठेतरी अर्धवट भिंतीचे अवशेष दिसतात. या सर्व इमारती फ्रान्सिस्कन चर्च व मठीच्या सरक्षंणासाठी बांधलेल्या होत्या. १५७७च्या वेढ्यात त्यांनी फार मोठी कामगिरी बजावली होती.

पोर्तुगीजांनी रोमच्या धर्तीवर रेवदंड्यास चर्चचे काम सुरू केले होते. सेंट झेव्हियअरने कॉलेज सुरू करण्यात तर डॉ. चेअरी स्टोव्हन याने फंड जमा करून मर्सी हाऊस सुरू केले होते. येथे सुरू केलेल्या कॉलेजमध्ये तर्कशास्त्र, खगोलशास्त्र, धर्मतत्वे, शिकविली जात अशी नोंद इतिहासात सापडते. १७३९मध्ये वसई मराठयाच्या ताब्यात गेल्यावर यापुढे आपला टिकाव लागणार नाही हे जाणून पोर्तुगीजांनी आगरकोट व कोर्लई हे दोन्ही किल्ले इंग्रजाना दिले. पुढे ॲग्लो-पोर्तुगीजांच्या प्रतिनिधी कॅप्टन इंचबर्ड यांच्या मध्यस्तीने १७४०मध्ये तह होऊन चौलचा प्रदेश मराठ्यांना मिळाला व पोर्तुगीज गोव्याला गेले.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# मुंबईचा सलग दुसरा विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सने गुरुवारी घरच्या मैदानावर झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा पराभव करीत यंदाच्या मोसमातील सलग दुसरा विजय नोंदवला. हैदराबादने विजयासाठी १६३ धावांचे आव्हान दिले होते. मुंबईने हे आव्हान १८.१ षटकांत पार केले.



हैदराबादने दिलेल्या १६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईने झटपट सुरुवात केली. विशेषतः रोहित शर्माने वानखेडेवर तीन षटकार लगावत उपस्थित असलेल्या चाहत्यांची मने जिंकली, पण पुन्हा एकदा, रोहित (२६) त्याच्या डावाचे मोठ्या धावसंख्येत रूपांतर करण्यात अपयशी ठरला. रायन रिकेल्टनने (३१) काही मोठे फटके मारले आणि त्यानंतर सूर्यकुमार यादवने दोन चौकार दोन षटकार लगावत २६ धावांची खेळी केली.

दरम्यान, विल जॅक्सनेही संघाच्या धावसंख्येत मोठी भर घातली. विल जॅक्स २६ चेंडूत दोन षटकार आणि तीन चौकारांसह ३६ धावा करत बाद झाला. सूर्या आणि विलने २९ चेंडूत ५२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली, तर पॅट कमिन्सने (३/२६) दोन्ही विकेट घेऊन पुनरागमनाच्या आशा निर्माण केल्या असल्या तरी तोपर्यंत खूप उशीर झाला होता. हार्दिक पांड्या (२१) आणि तिलक वर्मा (१७) यांनी संघाला विजय मिळवून दिला.

दरम्यान, १८व्या षटकात मोठा ड्रामा पहायला मिळाला. मुंबईला विजयासाठी दोन धावांची गरज असताना तिलक वर्माने एक धाव घेत हार्दिकला स्ट्राईक दिली. हार्दिक पुढच्या चेंडूवर झेलबाद झाला. नमन धीर दोन चेंडूवर एकही धाव काढू शकला नाही. तो पाचव्या चेंडूवर नमन धीर पायचीत झाला, तर अखेरच्या चेंडूवर सँटनर एक धाव घेण्यात अपयशी ठरला. अखेरीस तिलक वर्माने १९व्या षटकात झिशान अन्सारीच्या पहिल्या चेंडूवर चौकार लगावत संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

तत्पूर्वी एरव्ही वादळी फलंदाजी करणाऱ्या सनरायझर्स हैदराबाद संघाला मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजीसमोर मोठी धावसंख्या उभारता आली नाही. अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड या स्फोटक सलामी जोडीला चौकार आणि षटकार मारण्यासाठी संघर्ष करावा लागला. अभिषेकने तरीही काही छान फटके मारून ४० धावांची खेळी करत संघाला जलद सुरुवात देण्याचा प्रयत्न केला, पण हेड त्याच्या संपूर्ण डावात संघर्ष करत राहिला आणि २८ धावा करत माघारी परतला. हैदराबादने शेवटच्या तीन षटकांत ४७ धावा केल्याने ते दीडशेपार पोहचू शकले.

## रोशन खाडे ‘कर्जत-खालापूर श्री’चा मानकरी

**खोपोली : प्रतिनिधी**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्ताने ‘दीपक ब्रदर्स’ आयोजित शरीसौष्ठव स्पर्धा डॉ. आंबेडकर पुतळ्यासमोरील पटांगणात रंगली. या स्पर्धेत मुंबई पोलीस रोशन खाडे याने कर्जत-खालापूर श्री २०२५ हा किताब पटकाविला. बेस्ट पोझर म्हणून शिवतेज ठाकरे व बेस्ट बॉडी इम्प्रुव्हमेंटसाठी सलमान नालबंद याला गौरविण्यात आले.

महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन संलग्न रायगड बॉडी बिल्डर्स अँण्ड फिटनेस असोसिएशनच्या मान्यतेने खोपोली शहर बॉडी बिल्डर्स असोसिएशनच्या सहयोगाने दीपक ब्रदर्सचे संस्थापक विकी गायकवाड, माजी नगरसेवक कैलास गायकवाड यांनी स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेत कर्जत व खालापूर तालुक्यातील २५ ते ३० स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे मुख्य आकर्षण मुंबई श्री, महाराष्ट्र श्री व मिस्टर इंडिया मिस्टर ऑलम्पिया समीर दाभिलकर होते. त्यांनीही प्रात्यक्षिक दाखवत उपस्थित तरुणांची मने जिंकली.

स्पर्धेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते सुधाकर घारे, खोपोली पोलीस ठाण्याचे निरीक्षक शीतल राऊत, खालापूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष संतोष जंगम, राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष अंकीत साखरे, माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, डॉ. सुनील पाटील, माजी नगरसेवक मोहन औसरमल, किशोर पानसरे, आरपीआय युवक जिल्हाध्यक्ष प्रमोद महाडिक, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अध्यक्ष दीपक गायकवाड, समीर मसुरकर, दिलीप पुरी, विशाल गायकवाड, रमेश जाधव आदी उपस्थित होते.

पंच म्हणून रायगड बॉडी बिल्डर्स अँण्ड फिटनेस असोसिएशनचे सेक्रेटरी दिनेश शेळके, जॉईंट सेक्रेटरी सुनील नांदे, खजिनदार राजेश आनगत, रमेश खरे, नितीन शेजवळ, जगदीश आगिवले, विजय खरोसे, गौरी वरणकर, सोनू म्हात्रे, सिद्धार्थ शिंदे, धनजंय आगिवले यांनी काम पाहिले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी दीपक ब्रदर्सचे नवीन देशमुख, प्रशांत मांगुळकर, विनोद सोलंकी, संजय सोलंकी, अंकित मोरे, अलोक गायकवाड, साजन गायकवाड, अमित पवार, रोहित पवार, जयेश पाटील, जगदीश आगिवाले, नितीन कांबळे, विनोद ओव्हाळ यांनी मेहनत घेतली.

## ‘वानखेडे’वर रोहितच्या षटकारांचे शतक



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सचा स्टार फलंदाज रोहित शर्मा हा आयपीएल स्पर्धेतील सर्वात अनुभवी खेळाडूंपैकी एक आहे. रोहितने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध झालेल्या सामन्यात षटकारांचे शतक पूर्ण केले आहे.

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात रोहित शर्मा इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला आला. धावांचा पाठलाग करताना त्याने १६ चेंडूंचा सामना करत २६ धावा चोपल्या. यादरम्यान त्याने तीन षटकार खेचले. यासह रोहितने वानखेडे स्टेडियमवर फलंदाजी करताना १०० षटकार पूर्ण केले आहेत.

रोहित शर्मा वानखेडे स्टेडियमवर फलंदाजी करताना १०० षटकार मारणारा पहिलाच फलंदाज ठरला आहे. यापूर्वी कुठल्याही फलंदाजाला असा कारनामा करता आलेला नाही. यासह आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात एकाच मैदानावर १०० षटकार मारणारा तो चौथा फलंदाज ठरला आहे. बंगळुरूतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर फलंदाजी करताना विराट कोहलीने १३० षटकार खेचले आहेत, तर माजी फलंदाज ख्रिस गेलच्या नावे १२७ षटकार मारण्याची नोंद आहे. याच संघातील आणखी एक फलंदाज एबी डिव्हिलियर्सने या मैदाना-वर खेळताना ११८ षटकार मारले होते.

## दासुन शनाका गुजरात टायटन्स संघात

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल स्पर्धेच्या गुणतालिकेत शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली गुजरात टायटन्स संघाने दुसरे स्थान पटकावले आहे. जीटीचा स्पर्धेतील सातवा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी होणार आहे. या सामन्यापूर्वी त्यांनी त्यांच्या संघात मोठा बदल केला.

अलिकडेच न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू ग्लेन फिलिप्स दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला. त्याच्या जागी कोणत्या खेळाडूला घ्यायचे याबाबत फ्रँचायझीने प्रशिक्षक व सपोर्टिंग स्टाफशी चर्चा केली. यामध्ये श्रीलंकेचा अष्टपैलू खेळाडू दासुन शनाकाचे नाव पक्के झाले.

## आयपीएलमध्ये पंच का तपासताहेत फलंदाजाची बॅट?

**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमियर लीगच्या १८व्या हंगामात काही सामन्यात मैदानातील पंच फलंदाजांची बॅट तपासताना पहायला मिळत आहे. हे दृश्य पाहिल्यावर काही क्रिकेट चाहत्यांना ही काय भानगड? असा प्रश्न पडू शकतो, पण ही भानगड तशी जुनीच आहे. फक्त टास्क नवे असल्याचे दिसते.

आयपीएल स्पर्धेला सुरुवात होऊन दोन आठवडे झाल्यावर मैदानात पंच काही फलंदाजांची बॅट तपासताना पहावयास मिळाले. मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या ताफ्यातून खेळणारा देवदत्त पडिक्कल आणि राजस्थान रॉयल्सच्या संघातील हेटमायर यांची मैदानात पंच बॅट तपासतानाचे काही फोटो सोशल




मीडियावर व्हायरलही होताना दिसले. आयसीसीने निर्धारित केलेल्या नियमानुसार फलंदाज बॅट वापरत आहेत याची खात्री करण्यासाठी पंच बॅटची तपासणी करताना दिसताहेत. आवश्यकतेनुसार बॅट तपासा, असे निर्देश सामनाधिकाऱ्यांनी पंचांना दिले आहेत. त्यामुळेच पंच काही फलंदाजांची बॅट तपासत आहेत.

बॅट तपासण्याचा नियम काही यंदाच्या हंगामापासून लागू झालेला नाही. याआधीही फलंदाजांची बॅट तपासली जायची. फक्त हे टास्क पंच मॅच सुरू होण्याआधी ड्रेसिंग रुममध्ये जाऊन करायचे, पण सध्याच्या घडीला फलंदाज अनेकदा वेगवेगळ्या बॅट्स वापरतात. त्यामुळेच पंचांना मैदानात बॅटची तपासणी करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

### असा आहे नियम

आयसीसीच्या नियमानुसार बॅटची जाडी ४.२५ इंच (१०.७९ सेंमी), मधल्या भागाची जाडी २.६४ इंच (६.७ सेंमी) तर काठाची जाडी १.५६ इंच (चार सेंमी) हून अधिक असू नये. याशिवाय बॅटची लांबी ३८ इंच (९६.४ सेंमी)हून अधिक असू नये. हेच तपासण्यासाठी मैदानातील पंच ‘बॅट गेज’ उपकरणाच्या माध्यमातून फलंदाजांची बॅटत तपासताना दिसत आहे.

## डेवाल्ड ब्रेव्हिस चेन्नईच्या ताफ्यात



**चेन्नई :** पुढचा एबी डीव्हिलयर्स असे वर्णन होणाऱ्या दक्षिण आफ्रिकेच्या डेवाल्ड ब्रेव्हिसला चेन्नई सुपर किंग्सने ताफ्यात सामील केले आहे. तडाखेबंद फटकेबाजी करणाऱ्या डेवाल्डला बेबी एबी नावाने ओळखले जाते. मुंबई इंडियन्सकडून खेळताना डेवाल्डने आपल्या प्रतिभेची चुणूक दाखवली होती. आता तो महेंद्रसिंह धोनीच्या चेन्नई सुपर किंग्ससाठी खेळताना दिसणार आहे.

दक्षिण आफ्रिकेच्या दोन टी-२० सामन्यात प्रतिनिधित्व केलेल्या डेवाल्डने आयपीएलसह कॅरेबियन प्रीमिअर लीग, मेजर लीग क्रिकेट तसेच साऊथ आफ्रिका टी-२० अशा ट्वेन्टी २० लीगमध्ये आपल्या बॅटची ताकद सिद्ध केली आहे. फर्स्ट क्लास क्रिकेटमध्येही डेवाल्डने दमदार सुरुवात केली आहे. २० सामन्यात ४१च्या सरासरीने चार शतक झळकावली आहेत.

## आयपीएलनंतर ‘एमसीए’ची लीग; मुंबईकडून खेळणाऱ्या खेळाडूंना स्पर्धा अनिवार्य

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या भारतात आयपीएल स्पर्धेचा थरार सुरू आहे. केवळ भारतातील नव्हे, तर जगभरातील खेळाडू या स्पर्धेत खेळताना दिसून येत आहेत. आयपीएलनंतर भारतीय संघातील स्टार खेळाडू मुंबईत होणाऱ्या टी-२० मुंबई लीग स्पर्धेत खेळताना दिसून येऊ शकतात. मुंबईकडून खेळणाऱ्या सर्व खेळाडूंना ही लीग स्पर्धा खेळावी लागेल, असे मुंबई क्रिकेट असोसिएशनने स्पष्ट केले आहे.

मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेचा फॉरमॅट हा आयपीएल स्पर्धेसारखाच असतो तसेच स्पर्धेतील सर्व सामने मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवले जातात. यापूर्वी खेळाडूंना ही स्पर्धा खेळण्यासाठी नाव नोंदणी करावी लागायची. त्यानंतर खेळाडूंवर बोली लावली जायची आणि मग ते खेळाडू ही स्पर्धा खेळण्यासाठी पात्र ठरायचे, मात्र आता मुंबई क्रिकेट असोसिएशनने मोठे पाऊल उचलले आहे. मुंबईकडून खेळणाऱ्या खेळाडूंना ही स्पर्धा खेळणे अनिवार्य असणार आहे.

भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, पृथ्वी शॉ, अजिंक्य रहाणे व शार्दुल ठाकूर हे स्टार खेळाडू देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईचे प्रतिनिधित्व करतात. यापैकी ज्या खेळाडूंची इंग्लंड दौऱ्यासाठी निवड होणार नाही, त्या खेळाडूंना ही स्पर्धा खेळणे अनिवार्य असणार आहे. रोहित शर्माकडेही विशेष जबाबदारी सोपवण्यात आली आहे.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com